# महाराष्ट्रीयांशीं हितगुज

९८५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ९३९१

★

REFBK-0009800

—विनोबा

# महाराष्ट्रीयांशीं हितगुज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८९८२ विः निबंध
क्रमांक १३११ नोंः दिः १५-१२-६४

विनोबा

संग्रहालय ठाणे
९८००
(स्थळ प्रत)

REFBK-0009800

सर्वोदय (भूदान) साहित्य प्रचार समिति
मणि-भुवन, १९ लॅबरनम् रोड, गांवदेवी, मुंबई ७

प्रकाशक :
श्री. बद्रीनारायण गाडोदिया
सर्वोदय (भूदान) साहित्य प्रचार समिति
मणि-भुवन, १९ लॅबरनम् रोड,
गांवदेवी, मुंबई ७

◆ ◆ ◆

पहिली आवृत्ति : ५०००

◆ ◆ ◆

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी,
मुंबई नं. ४

# नम्र निवेदन

पूज्य विनोबाजींच्या सहा प्रवचनांचा हा संग्रह आहे. हीं सर्व मूळ मराठींतूनच दिलेलीं आहेत. आतां महाराष्ट्रांतून विनोबाजींची पद-यात्रा सुरू होणार! त्यांनीं महाराष्ट्रीयांना उद्देशून मांडलेले विचार लोकरांत लोकर घरोघर पोहोंचावेत, म्हणून हा प्रयत्न करण्यांत आला आहे.

**'फोडिलें भाण्डार, धन्याचा हा माल। मी तव हमाल, भारवाही'** ही या संग्रहाचें सम्पादन करणाऱ्याची भूमिका. म्हणून सम्पादनांत कांहीं उणें-अधिक राहिलें तर वाचकांनीं सहन करून घ्यावें. आंतील वस्तूची गोडी तर अवीट आहे.

भूदान-यज्ञासंबंधीं, पूर्ण कल्पना येण्यासाठीं वाचकांनीं (१) भूदान-गंगा, (२) सर्वोदय-दर्शन, (३) सर्वोदयाचें घोषणापत्र, (४) सर्वोदयाचे आधार, (५) सम्पत्तिदान-यज्ञ, हीं पुस्तकें अवश्य अभ्यासावींत.

विनोबाजींचीं **'गीताप्रवचनें'** आणि **'स्थितप्रज्ञ-दर्शन'** हीं पुस्तकं तर नित्य पठनीयच आहेत.

**—रमाकान्त पाटील.**

मुम्बई, ता. १ मार्च १९५८.

# अनुक्रमांक


| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र-माउलीची विशेषता ... ... ... | ५ |
| २ | 'मराठीपणा 'चें जतन करूं या... ... | १२ |
| ३ | विज्ञानाच्या युगांत राजनीति टिकणार नाहीं !... ... | १९ |
| ४ | महाराष्ट्रांत मोकळा विचार सांगेन ... ... | २६ |
| ५ | दुधांतील साखर बना ... ... ... | ३७ |
| ६ | लोकसेवकांसाठीं पथ्यें ... ... ... | ४५ |
| | वेचलेले कण : १ ... ... ... | ५१ |
| | वेचलेले कण : २ ... ... ... | ५२ |

: १ :

# महाराष्ट्र-माउलीची विशेषता*

आतां मी महाराष्ट्रांत येणार आहें असें म्हटलें जातें. हा भविष्यकाळ माझ्या अनुभवांत बसत नाहीं. मी महाराष्ट्रांत नाहीं, असें ज्या दिवशीं किंवा ज्या क्षणीं मला वाटत असेल असा एकहि दिवस आणि एकहि क्षण मला माहीत नाहीं. आपापल्या देशाचें आणि स्थानाचें वैभव लोक प्रेमपूर्वक गात असतात. परन्तु त्याचें मूल्यमापन बुद्धीच्या कांटेकोर तराजूत घालून करायचें नसतें. आपण सारे भारतीय या संज्ञेहून लेशमात्रहि कमी व्यापक होऊं शकत नाहीं. जास्तच व्यापक होऊं शकतों. भारताचें वैभव गातांना कवि टिळकांनीं एक पद्य लिहिलें आहे. भारताला उद्देशून लिहिलें असलें तरी तें पद्य आहे मराठीमध्यें आणि मराठी भाषेलाहि तें तितकेंच लागू पडतें. (संस्कृत सोडल्यास मराठी भाषेशीं माझा जो परिचय आहे तो इतरांशीं नाहीं; जरी दुसऱ्या भाषांचा अभ्यास मीं केला तरी.) कवि टिळकांनीं म्हटलें आहे :

**तूझ्या महोदार सारस्वताच्या**
**महासागरींचा जरी मीन मी।**
**झालों तरीही तृषा मन्मनाची,**
**कधींही कधींही न होणें कमी॥**

महोदार सारस्वत! अनेक भाषांचें अध्ययन मला घडलें आहे. आणि ज्या भाषांचें अध्ययन घडलें नाहीं त्याहि भाषांत काय आहे याचें ज्ञान मला आहे. संस्कृतासारखें महोदार सारस्वत जगातल्या कोणत्याहि भाषेंत नाहीं. या बाबतींत मला मुळींच शंका नाहीं. यांत अभिमानाचा कुठेंहि लेश नाहीं. आणि अशा संस्कृत सारस्वताचा सर्वोत्तम अंश महाराष्ट्राच्या संतांनीं वेचून घेतला आहे. मी उदाहरण देतों. 'भागवत!' संस्कृत सारस्वताचा हा उत्तम ग्रंथ. सबंध भारतावर आणि सगळ्या प्रांतांवर आणि सगळ्या वैष्णवांवर गीतेपेक्षांहि त्या

* महाराष्ट्रीय भूदान-कार्यकर्त्यांसमोर दिलेलें भाषण : म्हैसूर, ता. २६-९-१९५७.

ग्रंथाचा जास्त परिणाम झालेला आहे. परंतु इतर प्रांतांच्या कवींची रीत काय आहे? एक तर सबंध भागवतावर लिहायचें, किंवा त्याच्या एकाद्या अंशावर लिहायचें झाल्यास दशम स्कंधावर लिहायचें! ज्यानें कुणीं महाभारतावर लिहिलें आहे त्यानें या दोन गोष्टींपैकींच एखादी गोष्ट केलेली आहे. दशम स्कंध हा भगवान् श्रीकृष्णाची लीला गाणारा भागवतांतील मधुरतम अंश आहे. चैतन्य महाप्रभु, वल्लभाचार्य, निंबार्क, इत्यादि वैष्णव सन्त त्या दशम स्कंधावर पोसले आहेत. परंतु महाराष्ट्रांत एकनाथ हे भागवतधर्मीय असून आणि श्रीकृष्ण-लीलेविषयीं त्यांना अत्यंत आदर असूनहि त्यांनीं एकादश स्कंध निवडला. त्यांना तो सर्वोत्तम अंश वाटला. व्यक्तिनिरपेक्ष श्रीकृष्णचरित्र त्यांतहि आहे. म्हणून कृष्ण ही व्यक्ति तिथें लोपत नाहीं. पण दशम स्कंधांत ती व्यक्तिरूपानें प्रगट होते तर एकादश स्कंधांत ती बोधरूपानें प्रगट होते. महाभारतांत भगवान् श्रीकृष्ण सर्वत्र व्यक्तिरूपांत विराजमान आहेत, परंतु गीतेमध्यें ते बोधरूपानें विराजमान आहेत. म्हणून ज्ञानदेवानें गीता निवडली. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून एकनाथांनीं एकादश स्कंध निवडला.

### *मराठी भाषा : जणूं अजंठ्याचें लेणें*

अशा रीतीनें संस्कृत साहित्यांतून सारभूत अंश निवडून घ्यावा अशी दृष्टि महाराष्ट्रांतील संतांनीं ठेविली. त्यामुळें मराठी भाषेला अजंठ्याच्या लेण्याचें वैभव आलें आहे. आणि हेंहि ज्ञानदेवांनीं लिहून ठेवलें आहे. '**केलें ज्ञानदेवें गीतें देशीकार लेणें.**' लेणें म्हणजे शृंगार, आभूषण, आभरण, दागिना, अशा स्थूल अर्थानें ज्ञानदेवानें 'लेणें' शब्द वापरला असें नव्हे. तर त्याचें लक्ष त्या अजंठ्याच्या आणि वेरुळच्या लेण्यांकडे आहे. 'मराठी भाषेंत गीतेवर मीं लेणें केलें आहे' असें ज्ञानदेव म्हणतो. लेण्यांत काय असतें? तिथें दोन मसाले नसतात. एकच एक मसाला असतो. पहाड. एका पहाडांतून तें सर्व लेणें बनलें आहे. इमारतीमध्यें पहाल तर किती तरी प्रकारचा मसाला वापरलेला तिथें तुम्हांला दिसेल. परंतु लेण्यांत पहाड हा एकच मसाला. तसें मूळच्या गीतेमध्यें जें सार आहे त्यांत कांहीं कमीजास्त न करतां जसेंच्या तसें फक्त कोरुन दाखविलें आहे. हें वैभव सारें त्या दगडांत लपलेलें होतें. कारागिरानें प्रगट केल्यानंतर तुम्हांला वेरुळचें लेणें तिथें दिसलें. असा किती तरी अंश गीतेंत प्रगट झालेला आहे, तर कितीक लपलेला आहे. तो लपलेला अंश मुळांत होताच. तो फक्त ज्ञानदेवानें प्रगट केला!

तर माझा महाराष्ट्राशीं जो परिचय आहे तो त्या महाराष्ट्राशीं आहे.

### *संस्कृति, प्रकृति आणि विकृति*

आपण ज्याला संस्कृति म्हणतों तींत निव्वळ संस्कृतिच नसते. कांहीं असते प्रकृति, जी मानवांत सर्वत्र समान असते. कांहीं असते विकृति, जी मानवांत भिन्न भिन्न असते. आणि कांहीं असते संस्कृति, जी तारतम्यानें मानवास साधलेली आहे. कुठें कमी असेल, कुठें जास्त असेल, परंतु दिशा एकच आहे. भूक लागली म्हणजे खाणें ही प्रकृति आहे, जी सर्वच मानवांत समान आहे. भूक न लागतां खाणें किंवा भुकेपेक्षां जास्त खाणें ही विकृति आहे, जी अनेक ठिकाणीं सांपडेल. ब्राह्मणभोजनाचीं आणि आग्रह कर करून वाढण्याचीं वर्णनें साहित्यांत येत असलीं तरी ती सगळीच्या सगळी विकृति आहे, हें समजलें पाहिजे. भुकेल्या माणसांसाठीं स्वतः उपाशी राहून त्याला खाऊं घालणें, किंवा आज शिवरात्र आहे असें म्हणून उपवास करणें ही मानवाची संस्कृति आहे. अशा रीतीनें प्रत्येक संस्कृतीमध्यें असा त्रिविध अंश असतो. पैकीं प्रकृतीबद्दल अभिमान बाळगतां येत नाहीं, कारण ती प्रकृतिच आहे. मी मनुष्य आहें किंवा माझ्या शरीरावर केस उगवले आहेत त्याबद्दल काय अभिमान बाळगायचा? विकृतीचा अभिमान मनुष्य कधीं कधीं बाळगीत असतो. परंतु त्यानें हानि होते, परस्पर झगडे आणि द्वेष वाढतो. विकृतीलाच संस्कृति समजून मनुष्य तिचा अभिमान बाळगतो; परंतु ती सगळी विकृति आहे—आणि ती अभिमानास्पद नाहीं, प्रेमास्पदहि नाहीं; ती त्यागास्पदच आहे, हें ओळखलें पाहिजे.

त्याप्रमाणें आपल्या महाराष्ट्रामध्येंहि कांहीं प्रकृति आहे, कांहीं विकृति आहे, आणि कांहीं संस्कृति आहे. तर ती जी मूळ संस्कृति आम्हांला चक्रधर, मुकुंदराय, ज्ञानदेव यांपासून अखंड संतपरंपरेच्या ओघांत दिसून येते ती महाराष्ट्राची संस्कृति आहे. आणि त्या संस्कृतीशीं माझा दर दिवशीं आणि दर क्षणीं संबंध आहे. म्हणून मी नव्यानें महाराष्ट्रांत येणार आहें असें मला भासत नाहीं. मी केव्हांचाच महाराष्ट्रांत येऊन चुकलों आहें. आणि माझी खात्री आहे कीं, या गोष्टीचा परिणाम महाराष्ट्रावर आहे. या माणसानें आपल्या संस्कृतीचें ग्रहण केलें आहे; आणि त्याला थोडाफार उजाळाहि देण्याचा प्रयत्न केला आहे, या गोष्टीची जाणीव महाराष्ट्राला आहे. त्यामुळें माझ्या दृष्टीनें महाराष्ट्रांत येण्यानें किंवा न येण्यानें खास फरक पडत नाहीं.

## महाराष्ट्रांत श्रद्धेची कमतरता नाहीं

एका पत्रांत मीं असें लिहिलें होतें कीं, महाराष्ट्र बुद्धीला वश होणार नाहीं, प्रतिभेला वश होईल. 'महाराष्ट्रामध्यें श्रद्धा कमी आहे, बुद्धि अधिक आहे' असेंहि बोललें जातें. परंतु श्रद्धा ज्याच्या ठिकाणीं नाहीं असा माणूसच जन्माला आला नाहीं. कारण प्राण हें श्रद्धेचें लक्षण आहे. ज्याच्या ठिकाणीं श्रद्धा नाहीं त्याच्या ठिकाणीं प्राणच नाहीं, असें म्हणावें लागेल. प्राण भूतसृष्टीला चिकटून आहे तो श्रद्धेच्याच जोरावर. जीं काय सुखदुःखें मानवाला सहन करावीं लागतात त्यांची पर्वा न करतां प्राण चिकटून राहतो तो श्रद्धेमुळेंच. म्हणून 'प्राणी म्हणजे श्रद्धावान्' असें समीकरणच मी मांडीत असतों. त्यामुळें महाराष्ट्रांत श्रद्धा कमी आहे असें म्हणणाऱ्याला महाराष्ट्राचें ग्रहण झालें कीं न झालें तें सांगतां येणार नाहीं. परंतु श्रद्धा ही काय वस्तु आहे याचें मात्र ग्रहण झालें नाहीं असें म्हणावें लागेल. परिस्थितीप्रमाणें किंवा शिक्षणादि संस्कार कमी जास्त लाभल्यामुळें बुद्धि समाजामध्यें कमी अधिक असूं शकते. आणि महाराष्ट्रांत बुद्धि जास्त आहे असें सगळेच म्हणतात तर आपणहि मानावें. तसें मानायला अडचण कांहीं नाहीं. परंतु महाराष्ट्रावर परिणाम घडवून आणायला बुद्धि समर्थ नाहीं, एवढें लक्षांत घ्यायला पाहिजे.

नानासाहेब फडणीसानें बुद्धीच्या जोरावर तसा प्रयत्न करून पाहिला. परंतु त्याला तें साधलें नाहीं. '**खूप शर्थीनें राज्य राखिलें, यशवंत फडणीस नाना.**' राज्य जाईपर्यंत राखलें आणि कुणीहि मुत्सद्दी यापेक्षां अधिक कांहींच करीत नाहीं. नाना पाहत होता कीं, मराठ्यांचें राज्य जाणार आणि इंग्रजांचें राज्य येणार ! याबद्दल त्याला लेशमात्र शंका नव्हती ! परंतु स्वकर्तव्य म्हणून कांहीं असतेंच. 'देह मरणशय्येवर पडला आहे तेव्हां मेल्यानंतर लांकडें गोळा करण्यापेक्षां आतांच लांकडें गोळा करून शिलगावून द्या, म्हणजे काम लौकर होईल,' असें कांहीं म्हणतां येत नाहीं. पण जगण्यासाठीं मरणापर्यंत वाट पाहावीच लागते. आणि मनुष्य मरत नाहीं तोंपर्यंत शुश्रूषा इत्यादि सर्व करून जगविण्याचा प्रयत्न करावाच लागतो. तसें नानासाहेबांनीं ओळखलें होतें कीं, मराठी राज्याचें आतां मढें होऊन राहिलें आहे. परंतु प्राण आहे तोंपर्यंत सेवा करायची असें त्यांनीं ओळखलें होतें. परंतु बुद्धीशिवाय सेवेचें अन्य साधन नानाला उपलब्ध झालें नाहीं.

### महाराष्ट्राला प्रतिभाच आकर्षित करूं शकेल !

म्हणून जी गोष्ट सगळ्यांपाशींच थोड्याफार प्रमाणांत उपलब्ध आहे तिच्याबद्दल काय अभिमान बाळगायचा ? महाराष्ट्रांत प्रवास करीत असतां मी एकदां कोकणांतल्या एका भागांत गेलों. कांहीं खाण्यासाठीं घ्यावें म्हणून दुकानांत गेलों. कांहीं नाहीं तर निदान पोहे तरी मिळतील असें मानून गेलों. पण तिथें गेल्यावर कळलें कीं पोहे मिळत नाहींत. मीं विचारलें, 'असें कां बरें ?' तर म्हणे इथें पोहे घरांत असतात, दुकानांत नसतात !

तसें महाराष्ट्रांत प्राचीन कालापासून अध्ययन इत्यादि चालू असल्यामुळें बुद्धि आहेच. आपली ही जी देवनागरी लिपि बनली आहे ती निर्माण करण्यांत महाराष्ट्रीय विद्वानांचा हात होता. ती बनली काशीला. संस्कृतसाठीं ती बनली. ज्यांनीं ती बनविली त्यांत काशीचे पंडित होते आणि महाराष्ट्राचेहि पंडित होते. हिंदी आणि मराठी भाषेसाठीं ती लिपि स्वीकारण्यांत आली. इतर प्रांतांचेहि पंडित तिथें होते. परंतु त्यांचा ती लिपि बनविण्यांत हात नव्हता. त्यामुळें तिचा स्वीकार त्यांनीं केला नाहीं. एकाकाळीं काशीमध्यें जे विद्वान पंडित अग्रेसर होते त्यांत इतर प्रांतांबरोबर महाराष्ट्रीय पंडित देखील अग्रेसर होते. म्हणून महाराष्ट्रांत विद्येचें अध्ययन पूर्वीपासून चालत आलेलें दिसेल. त्यामुळें महाराष्ट्रांत सर्वांपाशीं बुद्धि थोडीफार उपलब्ध आहे. परंतु निव्वळ बुद्धि महाराष्ट्राला आकर्षित करूं शकणार नाहीं, प्रतिभाच आकर्षित करूं शकेल !

### 'मंगला'वांचून शब्दच निघूं नये

म्हणून मीं एका मित्राच्या पत्रांत लिहिलें होतें कीं, भूदानाचें महाराष्ट्राला आकर्षण वाटलें नाहीं याचें मला नवल वाटत नाहीं, कारण त्यांत प्रतिभा नव्हती. त्यांत प्रेम, दया इत्यादि असलीं तरी प्रतिभा नव्हती. परंतु ग्रामदानांत प्रतिभा आहे. म्हणून ग्रामदान महाराष्ट्राला आकर्षित करील अशी माझी अपेक्षा आहे.

तर आतां माझें तुम्हाला असें सांगणें आहे कीं, ग्रामदानपरिषदेनंतर या वस्तूला प्रतिकूल असणारा एकहि माणूस महाराष्ट्रांत उरणार नाहीं. (औषधाला एखादा प्रतिकूल सांपडलाच तर तो त्या दृष्टीनें उपयोगीहि आहे !) तुमच्या मुंबई असेंब्लीमध्यें पाहिलें तर सरकारी आणि विरोधी पक्षांतली मंडळी समानरूपानें ग्रामदानाला अनुकूल आहेत. म्हणून आतां महाराष्ट्रामध्यें तुकारामानें म्हटल्याप्रमाणें आचरण व्हायला पाहिजे. तुकारामानें एका अभंगांत रामराज्याचें वर्णन

केलें आहे, **‘राम राजा राम प्रजा राम लोकपाळ। एकचि सकळ दुजें नाहीं’** हें रामराज्याचें वर्णन तुकारामाला आवडलें. तुकारामाला स्थूल वर्णन आवडलें नाहीं. ‘एकचि सकळ दुजें नाहीं’ तिथें दुजेपणा, द्वैत नव्हतें. जसें अजंठ्याच्या लेण्यामध्यें पहाड हा एकच एक मसाला आहे, तसें रामराज्यामध्यें राजा, प्रजा, लोकपाळ सारें रामच राम; आणि म्हणून तुकाराम म्हणतो कीं तिथें **‘मंगलावांचूनि उमटेना वाणी’**, रामराज्यामध्यें मंगलावांचून अन्य शब्दच वाणींतून निघूं शकत नाहीं. तसें महाराष्ट्रामध्यें आतां मंगलाशिवाय शब्दच निघूं नये हें मला हवें आहे.

### *महाराष्ट्राला कोण जिंकील ?*

तुकारामानें रामराज्याचें हें वर्णन केलें असलें तरी तुकारामाच्या स्वतःच्या वाणींत हें दिसत नाहीं. तळमळीमुळें, अहिंसेच्या आवेशामुळें, त्याच्या स्वतःच्या वाणींतून हिंसा प्रगट झाली आहे. येशू ख्रिस्ताचेंहि असेंच होतें. ‘अरे पाप्यांनो, तुम्हांस हाय हाय!’ बायबलचें मराठी भाषांतर मला मुळापेक्षांहि गोड वाटतें. तें तुम्ही वाचून पहा. फारच गोड आहे. खालच्या स्तरांतली मिशनऱ्यांची ती भाषा फारच ‘एक्सप्रेसिव्ह’ आहे. “Woe unto you oh sinners” यापेक्षां ‘अरे पाप्यांनो, तुम्हांस हाय हाय!’ यांत कितीतरी अधिक गोडी आहे! अगदीं तळमळीचे उद्‌गार! परंतु क्रुसावर चढणें हा त्याचा परिणाम. दुसरें उदाहरण सॉक्रेटिसाचें. जो येईल त्याला तो फजित करी. ज्ञान देण्यासाठींच का होईना, पण चिडवायचें, डिवचायचें! टॉलस्टायचेंहि तसेंच. अगदीं दांत-ओंठ खाऊन अहिंसा प्रतिपादन करायची! त्या मानानें गांधींची भाषा फार सौम्य. परंतु तुकाराम हा त्या इतर लोकांसारखा होता. म्हणून **“ तुका म्हणेलासूं फासूं देऊ डाग ”, “ नाठाळांचे काठी देऊं माथा ”** अशासारखे उद्‌गार त्याच्या वाणींतून निघाले. परंतु ज्या स्तरांत तुकाराम वाढला त्या स्तरांतली ती संस्कृति आहे. पण रामराज्याचें वर्णन करतांना त्यानें ‘मंगलावांचूनि उमटेना वाणी’ असें लिहून ठेवलें आहे. एवढें जर तुम्हांला साधलें तर तुम्हीं महाराष्ट्र जिंकला, असें होईल. **‘अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ आणि पायाचा मजबूत’** असा मनुष्य महाराष्ट्राला पाहिजे कीं त्यानें जिंकलें.

### *ग्रामदान उचितकर्म, अतएव अवश्य आचरणीय !*

आणखी एक गोष्ट. माझी अशी इच्छा आहे कीं महाराष्ट्रांत शिरल्यानंतर

'भूदानी' किंवा 'ग्रामदानी' म्हणून मी फिरणार नाहीं. एखादा बालक मातृस्थानीं जावा तसा मी जाईन आणि मी जो काय वेडा, वांकडा, विचका, गोड, आंबट, कडू, असेन तसा महाराष्ट्रापुढें प्रगट झालों तरी महाराष्ट्राला मी आवडेन अशी मला खात्री आहे. म्हणून माझा असा कोणताहि हेतु घेऊन मी महाराष्ट्रांत जाणार नाहीं.

कर्म कोणतें करावें यासंबंधीं ज्ञानदेवानें म्हटलें आहे: "**म्हणौनि जें जें उचित। आणि अवसरें करूनि प्राप्त। तें कर्म हेतुरहित, आचरें तूं॥**" अशी कर्माची त्रिविध कसोटी मांडली आहे. जें कर्म करावयाचें तें उचित असलें पाहिजे. परंतु उचित कर्मेंहि पुष्कळ असतात. म्हणून कर्म 'अवसरें करूनि प्राप्त' म्हणजे युगाला धरून असलें पाहिजे. तेव्हां ग्रामदान हें उचित कर्म आहे आणि अवसरें करून प्राप्त आहे यांत वाद नाहीं. म्हणून हें कर्म अवश्य आचरणीय आहे.

### *ज्ञानोबाची मेख*

परंतु ज्ञानदेवानें आणखी आपली एक मेख मारून ठेविली आहे, जिला मराठींत '**ज्ञानोबाची मेख**' म्हणतात. ती तो मधें मधें घालीत असतो. गीतेमध्यें ठिकठिकाणीं ती आढळते. '**समत्वं योग उच्यते**' यावर भाष्य करतांना '**मन आणि बुद्धीचें ऐक्य**' असें ज्ञानदेवानें घालून दिलें आहे. ती त्याची मेख आहे! मुळांत ती कुठें तुम्हांला दिसणार नाहीं. समत्व म्हणजे कर्माच्या फळाविषयीं तटस्थता, इत्यादि व्याख्या होईल ती होईल. परंतु 'मन आणि बुद्धीचें ऐक्य' हें कुठेंच सांपडणार नाहीं. ही 'ज्ञानदेवाची मेख' आहे. तशी मेख कर्माच्या व्याख्येंत आहे. 'हेतुरहित' ही ती मेख! तेव्हां त्या दिशेनें माझा प्रयत्न राहील. ग्रामदान तर मंडळी करतीलच आणि त्यासाठींच मी येत आहें हेंहि सर्वांना माहीत आहे. परंतु मी मात्र हेतुरहित होऊन तिथें येणार आहें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २८९८५ वि: ८१९३
क्रमांक ९३२१ नों: दि: १५५३...

: २ :

# 'मराठीपणा'चें जतन करूं या*

हें बंगलोर शहर मराठी लोकांना नवीन नाहीं. शिवाजी महाराज या शहरांत राहत होते. स्वराज्यासाठीं दक्षिणेंत फार मोठा प्रयत्न झाला होता, तो शेवटचा म्हटला पाहिजे. विजयनगरच्या राज्याचा पराभव झाल्यानंतर दक्षिणेंत स्वराज्याचा लोप झाला. विजयनगरनंतर स्वराज्यासाठीं सर्वोत्तम प्रयत्न शिवाजी महाराजांनीं केला. कर्नाटकांत बंगलोरला त्यांचें ठाणें होतें. त्यांची दृष्टि, जिला आपण साम्राज्याची दृष्टि म्हणतों तशी नव्हती. सर्व सुखी असावेत, सर्वांचें राज्य व्हावें, जुलूम, अन्याय नसावा, एवढाच त्यांचा उद्देश होता. 'आम्हीं धर्मासाठीं फकिरी घेतली आहे' असें त्यांनीं म्हटलें होतें. ते स्वतःला फकीर समजत. त्यांच्या मस्तकावर संतांचा आशीर्वाद होता. तुकारामाच्या कीर्तनाला ते नेहमीं धावून जात असत. त्या कीर्तनांचा त्यांच्या मनावर संस्कार होता. आणि रामदास तर त्यांचे गुरुच होते. त्यामुळें शिवाजीमहाराजांची बुद्धि अतिशय व्यापक होती. त्यांच्या सामुद्री सेनेचा अधिकारी मुसलमान होता. मुसलमान या नात्यानें त्यांनीं मुसलमानांशीं विरोध केला नाहीं, तर अन्यायाचा प्रतिकार व्हावा एवढीच त्यांची दृष्टि होती. अशी शुद्ध स्वराज्याची दृष्टि शिवाजीनंतरच्या काळांत राहिली नाहीं. नंतरच्या मध्यंतरींच्या काळांत मराठी राज्य त्या उच्च भावनेवर चाललें नाहीं. आतां त्या इतिहासांत शिरण्याचें आपलें काम नाहीं.

### *लोकमान्यांचें ऐतिहासिक कार्य*

शिवाजीनंतर आपल्याकडे दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या तिघांनीं स्वराज्याची परंपरा चालविली. त्यानंतर दुसरे नेते आले. आणि आज आपण स्वराज्याचा उपभोग घेत आहोंत. टिळकांनीं हालअपेष्टा कष्ट सोसून, निर्भयपणें जनतेचा कैवार घेऊन, ज्या काळांत लोकांची कांहीं बोलायची हिंमत होत नव्हती त्या काळांत हिंमतीनें लोकांसमोर प्रत्येक गोष्ट स्पष्ट रीतीनें मांडून,

---

* 'महाराष्ट्र-मंडळा'समोर दिलेलें भाषण: बंगलोर, ता. १६-१०-१९५७.

स्वराज्याविषयीं जागृति निर्माण केली. तिच्याच पायावर, आधारावर, गांधीजींना आपलें सारें काम रचतां आलें.

गांधीजी दक्षिण आफ्रिकेंतून एक मोठें जीवनाचें तत्त्वज्ञान, व्यापक दर्शन घेऊन हिंदुस्थानांत आले. टिळकांनीं जर पूर्वभूमिका तयार केली नसती तर गांधीजींना पुढें जितक्या सुलभतेनें काम करतां आलें तितक्या सुलभतेनें करतां आलें नसतें, ही गोष्ट निःसंशय आहे. या काळांत महाराष्ट्रीय लोकांनीं टिळकांच्या नेतृत्वाखालीं आणि जुन्या काळांत शिवाजीच्या नेतृत्वाखालीं स्वराज्याच्या लढ्यांत जो भाग घेतला तो विसरण्यासारखा नाहीं. साऱ्या भारताच्या इतिहासांत त्याचें चिरस्थान आहे.

### *महाराष्ट्रीय संतांची विशेषता*

पण त्यापेक्षांहि अधिक उंच स्थान, महाराष्ट्रांतल्या संतांनीं जी कामगिरी केली तिला आम्ही देतों. आम्हीं बंगलोरमध्यें प्रवेश केला तेव्हां आमच्या स्वागता-साठीं आलेल्या लोकांतील एक टोळी एक भजन म्हणत होती. ते कानडी लोक होते. परंतु 'ज्ञानबा-तुकाराम' हें भजन ते म्हणत होते. हें मीं केवळ बंगलोरला ऐकलें नाहीं. बंगलोर तर महाराष्ट्राला जवळ आहे, पण कोईमतूर, मद्रास, ह्या ठिकाणींहि हें भजन ऐकलें. हें भजन म्हणणारे लोक मराठी नव्हते, तामीळ होते. त्याच्यापेक्षांहि दक्षिणेंत म्हणजे मदुरेला देखील मीं तें भजन ऐकलें. संतांनीं हें केवढें मोठें कार्य केलें ! आणि अशा काळांत कीं ज्यावेळीं आजचीं प्रवासाचीं साधनें नव्हतीं. त्यांनीं शंकर-रामानुजांप्रमाणें संस्कृतांत लिहिलें नाहीं. शंकर-रामानुजांनीं संस्कृतांत लिहिल्यामुळें त्यांचा भारतभर प्रचार झाला. पण केवळ ईश्वरभक्ति, प्रेम, समत्व, भूतदया इत्यादींच्या जोरावर थेट मदुरेपर्यंत त्यांनीं मजल गांठली. तामीळ प्रांतांत त्यापूर्वीं भक्तिरस नव्हता असें नाहीं. तिथें तर तो खूपच होता. परंतु तिथेंहि त्यांनीं प्रवेश केला, आणि आज ५००-६०० वर्षांनंतर तामीळ लोक भजनांत नामदेवाचें नांव गातात. ही कामगिरी लहान नाहीं. ते जीवनाच्या किती अंतरंगांत शिरले व त्यांच्या ठिकाणीं सार्वभौम प्रेम कसें होतें त्याची ती खूण आहे.

### *मराठीपणा म्हणजे काय ?*

इथें तुम्ही महाराष्ट्रीय थोडेसे आहांत. बंगलोरच्या सेन्ससमध्यें मराठी

बोलणाऱ्यांची संख्या पन्नास हजार लिहिली आहे. पण त्यांतले बहुतेक लोक अनेक वर्षांपासून इथें आलेले आहेत. ते फक्त घरांत मराठी बोलतात आणि तीहि जुनी मराठी आहे. बाकी त्यांची भाषा आतां कानडीच झाली आहे. पण तुम्ही लोक नवीनच इथें आलां आहांत. बहुतेक सरकारी नोकरवर्गांतले आहांत. इथें आल्यानंतर तुम्हीं दोन कामें करायला हवींत.

पहिली गोष्ट अशी कीं, आपला जो मराठीपणा आहे त्यांत अभिमानाला वाईट अर्थानें मुळींच वाव नाहीं. चांगल्या अर्थानें पूर्ण वाव आहे. तो तुमच्यांत प्रगट झाला पाहिजे. स्वराज्याविषयीं प्रीति आणि सार्वभौम प्रेम या दोन गोष्टी मराठीपणा बनवितात. स्वराज्यप्रेम म्हणजे, कांहींहि झालें तरी असें काम करावयाचें नाहीं कीं, ज्या योगानें स्वराज्याला धक्का पोहोंचेल, आणि संतांनीं शिकविलेलें अत्यंत व्यापक सार्वभौम प्रेम नष्ट होईल. तुकारामानें म्हटलें आहे, "**आमुचा स्वदेश, भुवनत्रयामध्यें वास**". 'आम्ही कुठें राहतों?' तर त्यानें हें उत्तर दिलें! तुकाराम देहूला—एका खेड्यांत राहत होता. नामदेवासारखा, रामदासासारखा, साऱ्या हिंदुस्थानांत फिरला नव्हता. नामदेव पंजाबांत गेले होते. तुकाराम लांबलचक हिंडला नव्हता. पण 'तुमचा स्वदेश कोणता?' असा प्रश्न विचारल्यावर 'भुवनत्रय' असें त्यानें उत्तर दिलें. छोटें उत्तर नाहीं दिलें. 'वन् वर्ल्ड'ची कल्पना सर्वांसमोर आहे. परंतु 'भुवनत्रय' ही त्यापेक्षां व्यापक गोष्ट आहे. ही ती व्यापकता, सार्वभौम प्रेम आणि स्वराज्य यांना धक्का लागेल अशी मुळींसुद्धां वागणूक नसणें या गोष्टी मिळून जो 'मराठीपणा' बनतो तो तुमच्यांत इथें दिसून पडला पाहिजे.

### *परप्रांतीय महाराष्ट्रीय हे इभ्रतीचे प्रतिनिधि!*

दुसरी गोष्ट अशी कीं तुम्ही कन्नड बंधूंच्या जीवनाशीं इतकें मिसळून जायला हवें कीं, आपण या प्रांतांत आलों, आपल्या वागणुकीवरून हे लोक आपल्या प्रांताविषयीं कल्पना करतील, हें ध्यानांत ठेवायला हवें. तुम्ही जसे वागाल त्यावरून सबंध महाराष्ट्राविषयीं इथें मत बनेल. तुम्ही नोकरीकरितां, पोटाकरितां इथें आलांत. पण पोटापाण्याबरोबर महाराष्ट्राचें हें दुसरेंहि पाणी तुम्हांला सांभाळायचें आहे. महाराष्ट्राची इज्जत, प्रतिष्ठा आपल्या कोणत्याहि वागणुकीनें खालीं पडतां कामा नये. मराठी भाषेची, प्रांताची, सार्वत मोठी वस्तु आपल्या जीवनांत दिसली पाहिजे. आणि ती म्हणजे सेवावृत्ति. कन्नड बंधूंना आपल्या-

विषयीं आदर वाटला पाहिजे. त्यांना असें वाटलें पाहिजे कीं, हे दुसऱ्या प्रांतांतून आले. सेवेंतच ह्यांना आनंद वाटतो. असा परिणाम त्यांच्या मनावर उमटला पाहिजे. महाराष्ट्राच्या इभ्रतीचे तुम्ही बिन निवडलेले प्रतिनिधि आहांत. हें तुमच्या वागणुकींत असलें पाहिजे.

तुम्हांला हें जरा कठीण आहे. मला हें फार सोपें आहे. कारण मी जिथें जातों तिथें फक्त एकच दिवस राहतों, आणि मी कितीहि जरी अवलक्षणी असलों तरी एका दिवसापुरतें तें अवलक्षण झांकून चांगलें प्रगट करूं शकतों. परंतु तुम्ही इथेंच राहणार! म्हणून झांकून काम चालणार नाहीं. तुम्हांला चांगलेंच वागलें पाहिजे. एका दिवसांत वाईट वागण्याइतका कांहीं मनुष्य मूर्ख नसतो. म्हणून एका दिवसांत तो आपली इज्जत, अब्रू, कायम राखून राहतो. पण एकाच ठिकाणीं राहण्यानें मनुष्याचें सर्व उघडें पडतें. म्हणून खरोखरी अंतरंत जें सौजन्य असतें तें प्रगट होतें. जेलमध्यें याचा खूप अनुभव आला. तिथें आम्ही सारीं माणसें दोन तीन वर्षें एकत्र राहिलों. म्हणून काय जे होते नव्हते ते दुर्गुण चव्हाट्यावर आले. बाकी सार्वजनिक व्यवहारांत दुरून दुरूनच माणसें दिसतात. कांहीं थोड्या वेळापुरतीं एकत्र येतात. त्यामुळें सारें झांकून असतें; पण जेलमध्यें मात्र सतत दोनतीन वर्षें चोवीस तास सारे एकत्र होते. त्यामुळें तिथें प्रत्येकाचें उघडें-नागडें जसें आहे तसें स्वरूप प्रगट झाल्यावांचून राहिलें नाहीं. म्हणून मला जेलमध्यें फार मोठी साधना घडली. मी समजलों कीं, या ठिकाणीं माझी सत्त्वपरीक्षा आहे, म्हणून चुकूनसुद्धां गाफीलपणा ठेवण्याची सोय नाहीं, असें समजून मी वागलों. परिणाम असा झाला कीं, जेलमध्यें जितक्या लोकांच्या संगतींत मी राहिलों, ते सारे माझे परममित्र झाले. तिथें मीं पूर्ण साधना केली. मला जेल मिळाला नसता तर हें इतकें आत्मपरीक्षण, इतकी सुलभ आध्यात्मिक साधना, ऋषींच्या आश्रमांत सुद्धां झाली नसती. ऋषींच्या आश्रमांत तर 'ऋषि आहेत आपल्याला दुरुस्त करायला' अशी भावना असते. त्यामुळें ऋषींच्या आश्रमापेक्षां जास्त सावधान साधना जेलमध्यें घडली. पण सर्वांना हें साधत नाहीं. आणि त्यांचें उघडें-नागडें स्वरूप तेथें बाहेर येतें. आमच्या यात्रेंत अगदीं सोपें काम असतें. कारण एका गांवीं एकच दिवस राहायचें असतें. पण एका ठिकाणीं राहून चहूंकडे सौजन्याचा सुगंध पसरवायचा म्हणजे गुलाब-मोगराच व्हायला पाहिजे. कन्नाडगांच्या चित्तावर आपल्या सौजन्याचा ठसा उमटविणें ही महाराष्ट्राच्या अब्रूसाठीं अवश्य गोष्ट आहे. तुमच्यासाठीं तर आहेच!

## सेवेची थोरवी

येथें शांतिसेना आणि सेवासेना सुरू होत आहे. त्यासंबंधीं तुम्ही नीट समजाऊन घ्या. एका काळीं महाराष्ट्रीय लोकांनीं ओरिसावर सत्ता गाजविली. ओडिया भाषेचा अभ्यास करतांना मी तेथील वाक्संप्रदाय व म्हणी वाचूं लागलों. त्याला त्या भाषेंत 'ढमढमाळी' म्हणतात. त्यांत दोन्ही 'ढ' असल्यामुळें तें चांगलें लक्षांत राहतें. त्यांत एक मराठी सरदाराची अशी विलक्षण म्हण आहे कीं, मला लाजेनें मान खालीं घालावीशी वाटली! 'आदा परजा चेचिले रस मिले', आलें आणि प्रजा यांना ठेंचलें कीं रस मिळतो! शिवाजीची जी स्वराज्याची दृष्टि होती ती पुढच्या वागणुकींत राहिली नाहीं, त्यामुळें आम्ही पराक्रम तर त्याहि काळांत केले, पण कांहीं गोष्टी अशा केल्या कीं, त्या शोभनीय नव्हत्या. ज्या ओरिसांत मराठ्यांनीं सत्ता गाजविली तिथें आज श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे सेवा गाजवून राहिले आहेत. जंगलांतल्या, खेड्यापाड्यांत राहणाऱ्या, ज्यांची भाषा देखील येत नाहीं, अशा लोकांच्या सेवेंत ते राबत आहेत. त्यांचें प्रेम संपादन करीत आहेत. आतां पुन्हां कधीं ओरिसाचा इतिहास लिहिला जाईल त्यांत हें लिहिलें जाईल कीं, 'एका महाराष्ट्रीय मनुष्यानें तळमळीनें, निष्काम भावनेनें, प्रेमानें सेवा केली'. त्यानंतर तें पूर्वीचें वाक्य धुतलें जाईल आणि 'मराठी लोकांची म्हण' अशी दुसरी म्हण रूढ होईल!

## सत्याग्रहांत प्रेम व शौर्य एकत्र येतात!

शांतिसेना, सेवासेना काय आहे, तें नीट लक्षांत घ्या. आपल्यावर ही जबाबदारी आहे कीं, या बंगलोर शहराची आपण सेवा करावी. तुम्ही नोकर लोक. तेव्हां तुमचा कांहीं वेळ कामांत जाणारच. परंतु उरलेल्या एक-दोन तासांत शंभर दोनशें घरांशीं परिचय करा. त्या लोकांकडे जायचें, त्यांच्यांत मिसळायचें, सुखदुःखाच्या गोष्टी बोलायच्या, कांहीं ना कांहीं सेवा करीत राहायचें आणि वेळप्रसंगीं आपलें बलिदान देण्याची मानसिक तयारी ठेवायची. आपल्या मनामध्यें लेशहि भीति, वैर, अप्रीति न राखतां, प्रेमपूर्वक आत्मबलिदान करण्याची तयारी ठेवायची, हें आम्हांला महात्मा गांधींनीं शिकविलें. क्षत्रियांचें शौर्य हा एक पंथ आणि संतांचा भक्तिमार्ग, प्रेममार्ग, हा दुसरा पंथ. पण सत्याग्रहांत दोन्ही पंथ एक झाले. आतां शिवाजी तुकाराम एक झाले! अशी जी युक्ति निघाली त्यांत गांधीजींचा फार मोठा गुण नाहीं. परमेश्वरानें

त्यांना निमित्त केलें. या वैज्ञानिक युगांत, निःशस्त्र हिंदुस्थानाला स्वराज्यप्राप्तीकरितां अहिंसेशिवाय गति नाहीं. म्हणून अहिंसेवर ज्यांची श्रद्धा आहे अशा माणसाची गरज होती. संतांचें प्रेम आणि वीरांचें शौर्य दोन्ही एक होऊं शकतात, हें गांधीजींनीं शिकविलें. तुकारामानें म्हटलें आहे, "आम्ही विठ्ठलाचे गाढे। कळीकाळ पाया पडे।" पराक्रम, शौर्य, साहस, हिंमत या गोष्टी प्रेमाबरोबर आल्या तरच खरी भक्ति होते. ही गोष्ट संतांना माहीत होती. पण गांधीजींनीं सामुदायिक संतत्व शिकविलें. प्रेम आणि शौर्य एकत्र करण्याचा तो जो व्यक्तिगत गुण होता तो त्यांनीं समूहांत आणला. सत्याग्रहांत अशी युक्ति आहे कीं, प्रेम आणि शौर्य एकत्र येतात. अक्षरशः एकरूप होतात. जें प्रेम तेंच शौर्य बनतें. तुम्ही सारे सत्याग्रहाचे दीक्षित व्हा. आणि प्रसंगीं देह फेंकून द्यायला हरकत नाहीं, अशी तयारी ठेवा. वाईट परिस्थिति निर्माण झाल्यास आमच्यावर बचाव करण्याची जबाबदारी राहील. या विज्ञानयुगांत आम्ही आत्मबलिदान करूनसुद्धां समाजांत शांति स्थापन करूं अशी प्रतिज्ञा घ्या. त्याकरितां रोज एखादा तास तरी समाजाची सेवा करीत राहा.

### *मराठी बोलतांना आराम वाटतो*

तुमच्यासमोर मराठी बोलतांना मला फार आनंद होत आहे. गेल्या साडेसहा वर्षांत मीं फक्त एक मराठी व्याख्यान दिलें. व हें आजचें दुसरें. बाकी सारीं हिंदी झालीं. फक्त कालीकतला गुजराती मंडळीसमोर एक गुजराथींत व्याख्यान दिलें. मला आतां मराठी व हिंदी यांत फारसा फरक उरला नाहीं. स्वप्नें सुद्धां हिंदींत पडतात! फरक इतकाच आहे कीं, मी हिंदी चुकत चुकत बोलतों. पण हिंदी लोक इतके उदार आहेत कीं, माझें बाल हिंदी, मी ज्याला 'प्री-बेसिक' हिंदी म्हणतों, ते नुसते सहनच करीत नाहींत, तर त्याला ते 'विनोबा स्टाइल' म्हणतात! हा त्यांचा फार मोठा गुण आहे.

मराठी बोलतांना मला आराम वाटतो, थकवा वाटत नाहीं. शब्द शोधावा लागत नाहीं. तसें अडीअडचणीला संस्कृत आहेच मदतीला. हिंदी बोलतांना मला हिंदी शब्द आठवला नाहीं कीं, मी संस्कृत शब्द घालतों. त्यामुळें असें झालें कीं, माझें अज्ञान झांकलें गेलें व मी ज्ञानी म्हणून जाहीर झालों!

### *सर्वांकडून दान कां हवें?*

भूदान, संपत्तिदान वगैरेविषयीं मी एवढेंच सांगतों कीं, तें ओझें म्हणून

द्यावयाचें नाहीं. प्रेम म्हणून द्यायचें, बिलकूल त्रास होणार नाहीं असें द्यायचें पण आमरण द्यायचें. दिल्याशिवाय खायचें नाहीं, हें मानवाचें व्रत आहे. जर असा समाज निर्माण झाला कीं, मानवाला द्यायची गरज राहिली नाहीं— असा समाज निर्माण होईल असा मला विश्वास वाटतो—तर मग पशुपक्ष्यांना देऊन खावें. तुम्ही लोक दूर नोकरीकरतां इथें आलेले. तरीपण प्रत्येकानें द्यायला हवें. मला अगदीं सर्वांकडून दान हवें आहे. एकानें जरी नाहीं दिलें तरी काम अपुरें राहिलें असें मी समजेन. गोवर्धन पर्वताची गोष्ट आहे ना? कृष्णानें सर्वांना सांगितलें कीं तुमच्या सर्वांच्या काठ्या लागू द्या, मग मी बघतों काय करायचें तें. सगळ्यांचे हात लागल्यावर देवानें आपली अंगुली लावली. आधींच अंगुली लावली असती तर काय बिघडलें असतें? हें बिघडलें असतें कीं, समूहशक्ति प्रगट झाली नसती आणि भगवच्छक्ति प्रगट झाली असती. समूहशक्तिच प्रगट व्हायला पाहिजे. म्हणून सगळ्यांनीं दान द्यायला पाहिजे. मात्र कोणीं नाहीं दिलें तर त्याच्यावर टीका होतां कामा नये. तुम्हीं दिलेल्या संपत्तिदानाची रक्कम मागायला तुमच्याकडे कोणी येणार नाहीं. एकतर तुम्ही स्वतः होऊन ती रक्कम भूदान कार्यालयांत द्या; किंवा कोणत्या कामांत खर्च केली त्याचा हिशेब द्या.

: ३ :

# विज्ञानाच्या युगांत राजनीति टिकणार नाहीं ! *

हिंदुस्तानांत साठ वर्षांनंतर मरण्याचा हक्क आहे, असें आम्ही आज सकाळीं बोलत होतों. आणि आतां त्यानंतर बाबा राघवदासजींच्या § मृत्यूची बातमी आली ! माझ्या उत्तर प्रदेशाच्या यात्रेंत ते सतत माझ्या मागेपुढें फिरत असायचे; आणि आतां तर पावणे तीन वर्षें त्यांची उत्तर प्रदेशांत यात्रा झाली. आतां आठ महिन्यांपासून ते मध्यप्रदेशांत हिंडत होते. शरिरानें ते माझ्यापेक्षां मजबूतच होते. त्यामुळें आतां आम्हां लोकांचा कांहीं भरंवसा आहे, असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. माझ्या बाबतींत मी सांगितलेंच आहे कीं मी घरीं बसलों असतों तर जितका धोका होता, त्यापेक्षां फिरण्यांत कमी धोका आहे.

आपण पुष्कळ वेळेला समाजकार्य हें एक बाह्य कार्य समजतों; आणि मग तें संसाराचें एक अंगच होतें. जसे खाजगी संसारांत राग, द्वेष, मत्सर येतात, तसे सार्वजनिक सेवेंतहि येतात. दोन्हीकडे, ते असतां कामा नयेत. पण सार्वजनिक सेवेंत तर नकोतच. व्यक्तिगत संसारांत देखील या रिपूंची गरज नाहीं. पण गरज नसतांनाहि ते येतात, तेव्हां त्याचा अर्थ असा कीं, सार्वजनिक सेवा चुकलेली आहे; तसे ते घरांत आले म्हणजे, तिथेंहि चूक आहे असें समजावें. कधीं कधीं आपण प्रयत्न करतों कीं, निदान सार्वजनिक कार्य तरी निर्मळ राहावें. पण माणसाच्या जीवनांत असे कप्पे नसतात. घरांत लबाडी चालेल, पण सार्वजनिक सेवेंत ती असतां कामा नये. पण असें होऊं शकत नाहीं.—

* महाराष्ट्रीय भूदान-कार्यकर्त्यांसमोर दिलेलें भाषण: ता. १७-१-१९५८

§ **बाबा राघवदास**—यांचें मूळ नांव राघवेन्द्र शेषो पाच्छापूरकर. मूळचे महाराष्ट्रांतील पण उत्तर प्रदेशला त्यांनीं आपली कर्मभूमि बनविली. ऋषितुल्य बाबाजी १३ एप्रिल १९५५ पासून सतत दोन वर्षें अखंड पदयात्रा करीत होते. ता. ११ जून १९५७ पासून आपली भूदान-यात्रा त्यांनीं मध्यप्रदेशांत सुरू केली. तेथें एकट्या सरगुज जिल्ह्यांत त्यांना ६१ ग्रामदानें मिळालीं. प्रादेशिक सर्वोदय संमेलनाला ते शिवणीला गेले होते. तेथें दोन दिवस ताप येऊन त्यांना ब्रॉंकोन्युमोनिया झाला, आणि ता. १५ जानेवारी १९५८ रोजीं रात्रीं त्यांचें देहावसान झालें.

सत्याचें व्रत घरांत असेल तरच बाहेरहि राहील. कोणी जर घरांत व बाहेर असे कप्पे करूं लागला तर ते टिकायचे नाहींत. सार्वजनिक कामांत सचोटीनें वागायचें, घरांत नाहीं वागलें तरी चालेल, असा जर कोणी प्रयत्न करूं लागला तर तें जमायचें नाहीं.

म्हणून घरांत व बाहेर हा फरक कृत्रिम आहे. कार्य घरांतलें असो कीं बाहेरचें असो, तें बाह्य कार्य नाहीं, आंतरिकच कार्य आहे. बाहेर कसाहि आकार दिसो, वस्तु आंतरिकच असते अशा भावनेनें कार्य करूं, तेव्हांच तें कार्य निर्दोष, निर्मळ, मनाला समाधान देणारें, व लोकसंग्राहक असें होईल.

बाबा राघवदास दीडशेंहून अधिक संस्थांत काम करीत होते. पण भूदान-यात्रा सुरू करण्यापूर्वीं त्यांनीं या सर्व संस्थांचा राजीनामा दिला. इतक्या सर्व संस्थांचा परित्याग करण्याची काय गरज होती? त्यांपैकीं ते फक्त काँग्रेस या एकाच राजनैतिक संस्थेचे सदस्य होते. बाकी तर साऱ्या रचनात्मक संस्था होत्या. गीता-प्रचार, शाळा, कुष्ठ-सेवा, हरिजन-सेवा, इत्यादि अनेक सेवा-कार्यें ते करीत होते. त्यांच्या सेवेला अंतच नव्हता. परंतु या सर्व संस्थांचा राजीनामा त्यांनीं विचारपूर्वक दिला. त्यांनीं त्या वेळीं मला हेंहि विचारलें कीं, 'सर्व-सेवा-संघा'च्या सदस्यत्वाचाहि राजीनामा देऊं का? मीं त्यांना सांगितलें कीं, राजीनामा देण्याची गरज नाहीं. कारण 'सर्व-सेवा-संघ' ही अनुशासनाची संस्था नाहीं. तेव्हां ते त्या संस्थेचे सभासद राहिले. पण बाकी कोठल्याहि संस्थेचे सभासद राहिले नाहींत. गृह, संसार, तर त्यांचा नव्हताच. ते ब्रह्मचारी होते, परमहंस होते. पण दुसरा संसार, व्याप, त्यांचा इतका मोठा होता कीं, उत्तर प्रदेशांत पं. नेहरू किंवा टंडनजी सोडले तर आणखी कुणाचा एव्हढा व्याप नसेल. पण पं. नेहरू किंवा टंडनजींचाहि बाबांच्या इतका मोठा व्याप नसेल. बाबा अगदीं खेड्याखेड्यांत जायचे, आम जनतेशीं त्यांचा संबंध होता. कुणींहि त्यांना सेवेला बोलवावें, ते तयारच असायचे. पण त्यांनीं इतक्या सर्व संस्थांचा त्याग केला. त्याचें मुख्य कारण हें कीं हीं कामें चित्ताच्या पूर्ण एकाग्रतेशिवाय पार पडत नाहींत. क्रांति क्रांति म्हणायचें आणि अनेक कामें करायचीं हें जमत नाहीं. तुकाराम म्हणतात: "एक मन तुझें। अवघ्या भांडवला॥" तुझें एक मन, किती व्यापारांत गुंतवशील? संस्था चालविण्यांत राग, द्वेष, उत्पन्न होतात; हा सर्वांचाच अनुभव आहे. बाबा त्यांतून मुक्त होते. व केवळ बालवृत्तीनें, मोकळेपणानें हिंडत होते. असा फार मोठा कार्यकर्ता आपल्यांतून गेल्यावर एकदम प्रश्न निर्माण होतो कीं, त्यांची जागा

घेणार कोण ? तूर्त तरी त्यांची जागा घेणारा कुणी नाहीं. ही जी परंपरा खंडित होते, त्याचें कारण असें कीं जीवनाचीं जीं मूलतत्त्वें आहेत, त्यांवर आपली बैठक नाहीं. त्यामुळें उपनिषदांनीं म्हटल्याप्रमाणें 'ज्ञानसंतति' राहत नाहीं.

### *लहान व्यक्तिच महान् कार्यांच्या वाहक असतात*

आपण लहान माणसें आहोंत. परंतु आपण हें ओळखायला हवें कीं, आपण लहान आहोंत, पण काम महान् आहे. या कामाच्या मुळाशीं जे विचार आहेत ते आपण पचविले तर विचारच काम करतील. "निरोपाच्या मापें करी लडबड।" आपण पोस्टमन होऊं या, तुकाराम देवाचा निरोप्या झाला, तसें होऊं या. पोस्टमन निरहंकार असतो. तसे आपण विचाराचे वाहक होऊं. अभिमानशून्य बनूं तर आपण जरी लहान असलों तरी आपल्यामार्फत महान् संदेश पोहोंचेल. पोस्टमन लहान असतो, पण कधीं कधीं तो महान् संदेश पोंचवतो. म्हणून आपण लहान आहोंत, पण परमेश्वर आपल्या मार्फत महान् संदेश देईल. मध्यें आपली लुडबुड कामाची नाहीं. इतकें साधल्यावर कर्माचें रूपांतरच होतें.

परमेश्वराचें कार्य महान् आहे. तो लहान साधनाद्वारेंहि काम घेतो. विनोबा मोठा माणूस म्हणून परमेश्वरानें त्याला हातीं घेतलें नाहीं. माझ्या मनांत तर खात्री आहे कीं, मी लहान माणूस आहें म्हणूनच त्यानें मला हातीं घेतलें. आतां एकदां त्यानें हातीं घेतल्यावर मग मोठेपण येतें. तें माणसाचें मोठेपण नव्हे, ती त्याची देणगी आहे. आपण लहान आहोंत तर आपल्या हातून कसें होईल, असें नका मानूं; तर असें माना कीं, आपण लहान आहोंत, म्हणूनच आपल्या हातून हें काम होईल. परमेश्वर लहानांच्या हातून काम घेतो असें मानून त्याला जीवन अर्पण करा.

ecoo

### *महाराष्ट्रांत शक्तीचा तुटवडा नाहीं*

महाराष्ट्रांत शक्ति अपार आहे, शक्तीचा तुटवडा नाहीं, असें मी निश्चित मानतों. महाराष्ट्राच्या लोकांची अशी समजूत आहे कीं, भारतांतल्या दुसऱ्या प्रांतांतील लोकांना महाराष्ट्रीय म्हटलें कीं, कांहीं तरी हीनता वाटते. परंतु माझा तर अनुभव अगदीं उलटा आहे. माझा तर अनुभव असा आहे कीं, महाराष्ट्रीयांविषयीं सर्वत्र आदर आहे, पण नेमका ज्या माणसांविषयीं आदर असायला हवा, त्यांच्याविषयीं आहे. ज्यांची पूजनीयता नाहीं, त्यांची पूजा कशी होणार ! ज्ञानदेव-

तुकारामाच्या नांवाचा घोष मीं थेट तामीळनाडमध्यें ऐकला. शिवाजीविषयीं सर्वत्र आदर आहे. टिळक, गोखले यांच्या नांवाचे हॉल कलकत्त्यांत, मद्रासमध्यें आहेत. भूदान-यज्ञांत जे महाराष्ट्रीय चारी दिशेला फिरले, त्यांच्याविषयीं त्या त्या प्रांताच्या लोकांना गौरव वाटला. श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे ओरिसांत काम करतात; त्यांच्याविषयीं ओरिसाला गौरव वाटतो. विमला ठकार सबंध भारतांत हिंडते तर सर्वांना तिचें कौतुक वाटतें. महाराष्ट्रीयांच्याविषयीं आदरांत कुठेंहि कमी नाहीं. अशा स्थितींत साडेसहा वर्षांनंतर विनोबा महाराष्ट्रांत येणार तेव्हां इतर प्रांतांनाहि महाराष्ट्राविषयीं अपेक्षा राहील. प्रभु आपल्या हातून खूप मोठें काम करून घेणार आहे हें ध्यानांत ठेवा व छोटे छोटे विचार सोडून द्या.

### *खरेपणाला स्वतःप्रामाण्य आहे !*

कार्यकर्त्यांनीं एकमेकांविषयीं मागाहून बोलूं नये, कुणाच्याविषयीं चांगलें ऐकलें तर विश्वास ठेवावा व वाईट ऐकलें तर विश्वास ठेवू नका. वाईटाविषयीं मजबूत पुरावा मिळाल्याशिवाय तें खरें मानूं नका. अभिमानी आईसारखी भूमिका असू द्या. माझी आई तशी होती. लहानपणीं मी खोडकर होतों. अंगांत ताकद नव्हती. पण कांहीं कांहीं किडकिडीत माणसें भांडखोर असतात तसाच मीहि होतों. एकदां एका मजबूत मुलाशीं मी कुस्ती खेळलों. कुस्तींत कांहीं भान राहत नाहीं. मीं त्यांत त्याचा सदरा फाडला. त्यानें माझ्या आईपाशीं तक्रार केली कीं, "विन्यानें माझा सदरा फाडला व शिवीगाळ केली." आईनें त्याला जें उत्तर दिलें तें तिनें मला मागाहून सांगितलें. पण मला पहिला प्रश्न विचारला कीं, 'तूं शिव्या दिल्यास?' मीं 'नाहीं' म्हणतांच तिला एकदम समाधान वाटलें. मग तिनें हसत म्हटलें कीं "तूं सदरा फाडलास हें दिसलेंच मला, पण मीं त्याला म्हटलें कीं, माझा विन्या शिव्या नाहीं देणार." त्या वेळीं जर मीं म्हटलें असतें कीं 'शिव्या दिल्या', तर तिला फार दुःख झालें असतें. आपला विन्या शिव्या देणार नाहीं, हा तिला अभिमान होता! असा अभिमान असावा. लहानपणीं आम्हांला शाळेंत 'Too' आणि 'Very' चे प्रयोग शिकवितांना असें वाक्य सांगितलें 'It is too good to be true.' नंतर पंधरवड्याची परीक्षा आली त्यांत 'too' च्या प्रयोगाचें उदाहरण द्यायला सांगितलें. मीं लिहिलें, 'It is too false to be true.' मास्तरांनीं मला विचारलें कीं, "असें लिहिण्यांत तुझा काय उद्देश आहे?" तेव्हां मीं म्हटलें कीं, "वर्गांत

सांगितलेलें तें वाक्य ऐकल्यापासून माझ्या मनांत चक्र चाललें आहे. मला वाटतें, असें कां असूं नये कीं, एखादी गोष्ट इतकी वाईट आहे कीं, ती खरी असणें शक्य नाहीं." मास्तर म्हणाले, तूं ठीक म्हणतो आहेस....खरेपणाला स्वतः-प्रामाण्य आहे. आणि परिपूर्ण पुराव्याशिवाय वाईट गोष्ट खरी नाहीं मानायची. पुरावे पाहत बसण्यांत आपलें आयुष्य फुकट नाहीं घालवायचें.

### *परस्परांवर प्रेम करा*

परिपूर्ण स्नेहाशिवाय समूहशक्ति प्रगट होऊं शकत नाहीं. शिवाजी व तानाजी काय एका वर्किंग कमिटीचे सभासद होते ? नाहीं. ते जीवश्च कंठश्च मित्र होते. एकमेकाकरितां प्राणत्याग करायला तयार होते. शिवाय एका कामांतहि होते. ते स्नेहानें पुढें गेले. आम्ही नुसते कामासाठीं एकत्र जमलों, व business meeting केली तर ती वर्किंग कमिटी झाली. आजकाल संस्थांच्या सभा कामाकरितां होतात, त्यांत निश्चित अजेंडा असतो. शिवाजी व तानाजी एका कामांत होते, पण परस्पर अनुराग, हेंच त्यांचें भांडवल होतें. ख्रिस्ताचे बाराच शिष्य होते; त्यांतलाहि एक गेला, पण उरलेल्या अकरांत गाढ प्रेम होतें. ते सारे 'कम्यून' करून राहत असत. 'Let us share every thing' असें म्हणून एकत्र राहत असत. 'कम्युनिझम्' शब्द त्यावरूनच बनला. ख्रिस्त मरतांना त्यांना सांगून गेला, 'Love one another'. प्रथम तो त्यांना सांगायचा कीं, 'Love thy neighbours as thyself', शेजाऱ्यांवर आपल्याइतकेंच प्रेम करा. हें अगदीं आत्मज्ञानच झालें ! आपल्यांत व दुसऱ्यांत मुळींच फरक नाहीं करायचा. त्यानंतर एक पाऊल पुढें जाऊन ख्रिस्तानें सांगितलें, 'Love thy enemy', शत्रूवर प्रेम करा. ही फार मोठी शौर्याची गोष्ट झाली. हें नुसतें जबाब देणारें प्रेम नव्हे, तर आक्रमणकारी प्रेम झालें. जबाब देणारें प्रेम तर जनावरांत देखील असतें. गाईला खायला घाला कीं ती तुमच्यावर प्रेम करील. कुत्र्यावर प्रेम करा कीं तें तुमच्याकरितां मरेल देखील. आपल्यावर प्रेम करणाऱ्यावर प्रेम करणें हा स्वभाव झाला. त्यांत तुमचें काय कर्तृत्व आहे ? पण आपला द्वेष करणाऱ्यावर प्रेम करणें यांत तुमचें कर्तृत्व आहे. तें प्रतिरोधी प्रेम आहे, अनुरोधी नव्हे. ख्रिस्ताची जेव्हां खात्री झाली कीं, आतां आपण मरणार ! तेव्हां त्यानें शिष्यांना बोलावून म्हटलें कीं 'मी तुम्हांला New Commandment देत आहें.' शत्रूवर प्रेम करा यापेक्षां कठिण Commandment तो काय देणार होता ? तो शेवटीं शिष्यांना सांगून गेला कीं 'Love one another'—'तुम्ही

परस्परांवर प्रेम करा.' 'तुम्हांला जेव्हां सगळे लोक Persecute करतील तेव्हां समजा कीं तुम्ही ईश्वराच्या जवळ आहांत. मी गेल्यावर लोक तुम्हांला छळतील, म्हणून एकमेकांवर प्रेम करा.'

### *प्रीति 'कारणरहित' असावी*

महाराष्ट्रांत जवळ जवळ शंभर कार्यकर्ते आहेत. त्यांच्यांत जर शिवाजी-तानाजीसारखा किंवा सेंट जॉन, सेंट पॉलसारखा अनुराग असला तर फार मोठी शक्ति निर्माण होईल. त्या अनुरागाला गुण हा आधार नको. गुणावर प्रेम नव्हे, तर कारणरहित प्रीति हवी. कारणयुक्त प्रीति नको. निष्कारण प्रेम पाहिजे. आपण भूदान कार्यांत एकत्र आलों म्हणून प्रेम हवें. मुलगा नकटा असला तर आई त्याला 'ए नकट्या' म्हणून प्रेमानें हांक मारते. नकटा म्हणून त्याच्यावर प्रेम करते, व त्याचें नाक सरळ असलें तर कसें शेंगेसारखें नाक म्हणून प्रेम करते! मुलगा शेंबडा असला तर शेंबडा म्हणून त्याच्यावर प्रेम करते. तिचें प्रेम कारणावर अवलंबून नसतें; तें वात्सल्यजन्य असतें. तसें आपलें प्रेम 'स्नेहजन्य प्रेम' असलें तर आपली शक्ति खूप वाढेल. मग कार्यकर्त्यांत बेबनाव, वैमनस्य, गैरसमजूत, राहणारच नाहीं. मीं आपलें एक धोरण ठेवलें आहे. माझ्याविषयीं कुणाचा गैरसमज झाला—तसा झालाहि आहे—तर मी त्या गैरसमजाला मानीतच नाहीं. त्याचें स्पष्टीकरण वगैरे कांहीं करीत नाहीं. मी त्याचा विचारच करीत नाहीं. देवानें इतकें सगळें केलें; पण एक चूक केली. ती अशी कीं त्यानें मनुष्याच्या छातीला खिडकी ठेवली नाहीं. त्यामुळें आंत काय चाललें आहे, काय नाहीं, हें कळत नाहीं. त्यानें खिडकी ठेविली नाहीं तर आपण आंत डोकावून पाहणें ठीक नाहीं. त्याला दिसत नाहीं, तिथें मी शिरायचें, हा उपद्व्याप, ही उठाठेव मीं कशाला करायची? कित्येकदां लोक बाहेरच्या घटनांवरून एकाद्याच्या मताचा अंदाज लावतात. मग त्याच्या चित्तांत अमुक प्रक्रिया चालल्या आहेत असें मानतात. हें सारें कशाला करायचें? स्वचित्तांतल्याच प्रक्रिया कळत नाहींत तर दुसऱ्याच्या चित्तांतल्या काय कळणार? तुम्ही परस्पर अनुराग कराल तर हे शंभर कार्यकर्ते म्हणजे कांहीं कमी नाहींत ठरणार!

### *विज्ञानयुगांत राजनीति टिकणार नाहीं!*

महाराष्ट्रांत आल्यावर मी हें सांगणारच आहें कीं, या युगांत राजकारणाला

महत्त्व देणें म्हणजे फार अदूरदर्शिता आहे. विज्ञानयुगांत राजनीति टिकणार नाहीं, गळूनच पडणार. येलवालला सारे नेते जमले. त्यांनीं सर्वसंमतीनें एक ठराव केला. पण त्याहिपेक्षां मोठी गोष्ट ही कीं तिथें आलेले नेते चित्तावर सद्भावनेचा ठसा घेऊन गेले. कारण त्यांना तिथें एक अशी जमात दिसली—जरी ती लहानच जमात होती—कीं त्यांतील लोक करुणेनेंच प्रेरित होते. त्यांच्यांत गुणदोष असतील. पण ते करुणेनेंच प्रेरित आहेत असा ठसा नेते घेऊन गेले. यापुढें जगांत राजनीति टिकणार नाहीं. विज्ञान कधीं माणसाचे तुकडे पडूं देणार नाहीं. आणि जर पडूं दिले तर विज्ञान खतम होईल, सगळें जग खतम होईल. 'सगळे मरा अथवा सगळे एक व्हा', हें विज्ञानाचें Challenge आहे. म्हणून किरकोळ राजनीति, भेद पाडणाऱ्या गोष्टी, सारें out of date झालें आहे. नारद म्हटला म्हणजे रामनामच सांगणार, त्याप्रमाणें मी महाराष्ट्रांत आल्यावर हेंच सांगणार कीं, विज्ञानयुगांत राजनीति टिकत नाहीं, मानस टिकत नाहीं !

## : ४ :

# महाराष्ट्रांत मोकळा विचार सांगेन*

कर्नाटकचें काम संपल्यावर माझें महाराष्ट्रांत येणें आतां अगदीं निश्चित झालें. तसें महिना दोन महिने मागें-पुढें होईल, पण बरीच चर्चा झाल्यानंतर मला वाटतें कीं सरळ ओघानें जें आलें, तें दुसरा लाभ करून घेण्याच्या उद्देशानें टाळणें म्हणजे प्रवाहपतितासारखें नाहीं होणार, तें मुद्दाम केल्यासारखें होईल. आणि मुद्दाम काम करणें हें मुक्तीच्या मार्गांत बसत नाहीं. आतां जर मी येथून केरळांत गेलों तर एका बाजूनें काम अधिक चांगलें झाल्यासारखें होईल, पण दुसऱ्या बाजूनें होणार नाहीं. मी तिथें गेल्यावर कांहीं काम झालें तर कदाचित् तेथील मंडळींची शक्ति, आत्मविश्वास कमी होईल. तेव्हां इथून कोरापुटकडे किंवा केरळांत जाणें भक्तिमार्गांत येत नाहीं, ज्ञानमार्गांत येतें. आणि ज्ञानमार्ग धोक्याचा आहे. कारण शेवटीं आपण आपल्याच बुद्धीनें काम करणार. म्हणून सगळ्यांच्या सल्ल्यानें अखेरीस हें ठरलें कीं महाराष्ट्रांत जायचें.

### *महाराष्ट्राकडून अपेक्षा*

आतां सहा वर्षांत जें कांहीं काम झालें, तो पुण्यसंचय यानंतर दुसऱ्या प्रांतांत प्रवेश करतांना मोफतच मिळतो तेव्हां आतां भाषा व भावना पुढचीच येणार, मागची येणार नाहीं. आतां महाराष्ट्रांत जर कुणीं पांच एकर किंवा शंभर एकर जमीन दिली तर त्याचें कौतुक होणार नाहीं. ती सहा वर्षांपूर्वींची अवस्था होती. आतां भाषा, भावना व अपेक्षा बदलल्या आहेत. मोठी भाषा आल्यानंतर काम कितीहि अल्प झालें तरी मोठेंच होणार. बहुधा अशीं कामें होतात, तीं लहान माणसांकडून करविलीं जातात. गांधीजींच्या जमान्यांत कुणाकुणाला वेग मिळाला ? वादळांत पाचोळा वर उडावा, पक्षी नव्हेत, त्याप्रमाणें जे लोक जेलमध्यें जाऊन थकले त्यांच्याहि पायांना व डोक्याला गति मिळतच होती. ते

---

* महाराष्ट्रीय भूदान-कार्यकर्त्यांसमोर दिलेलें भाषण: हानगल, जि. धारवाड ता. १८-१-१९५८.

जेलमध्यें जाऊन थकायचे हें त्यांचें पुण्य—पण प्रवाहाचें पुण्य हें कीं त्याच माणसांना तो पुन्हां चळवळींत उडी घ्यायला लावायचा. जसे पतंग दिव्यावर झडप घालतात त्याप्रमाणें काळाचा वेग त्या माणसांना पुढें न्यायचा.

येलवालच्या परिषदेनंतर आतां ग्रामदानाचें काम सर्वमान्य झालें आहे. आतां त्याची गति कमी राहिली, किंवा तें अंमलांत आलें नाहीं तर त्यांत सर्वांची बदनामी होईल, एका-दोघांची नव्हे. म्हणून आतां हें काम कालगतीनें होणार यांत शंका नाहीं. पण महत्त्वाची गोष्ट ही कीं हें ओघानें झालेलें काम आहे. त्या निमित्तानें महाराष्ट्राची जनशक्ति बळावली, नवीन मन बनलें, तर फार मोठी कमाई होईल. नवीन मन बनलें नाहीं, जुन्या मनांत राहून कितीहि कमाई झाली, तरी ती कांहीं शक्ति वाढविणारी अमृत-संजीवनी ठरणार नाहीं. तें तात्पुरतें Tonic ठरेल. इच्छा अशी आहे कीं, या निमित्तानें आपल्या प्रकृतींत काय खळमळ असतील ते धुतले जावेत, जे गुण असतील ते वाढावेत, नवीन गुण प्रगट व्हावेत, व समाज गुणसंपन्न बनावा. ही मुख्यतः अपेक्षा आहे.

### *अजून सत्याचें प्रमेय बनल नाहीं*

आज नवीन धर्म स्थापन होत आहे. कदाचित् माझ्या मनाची घडणच तशी असेल; पण मी या सगळ्याकडे फार श्रद्धेनें पाहतों. माझी बुद्धि काम करीतच असते, पण हें बुद्धीचें क्षेत्र नाहीं. मी माणसांकडे श्रद्धेनें पाहतों. कुणी विचारतात कीं 'ईश्वर कसा दिसेल?' मी उत्तर देतों कीं 'तुम्ही त्याची चिंता करूं नका. एवढी श्रद्धा ठेवा कीं तो आहे.' असल्यावर मग त्याच्या प्रवेशासाठीं आमचे दरवाजे उघडले, तर तो स्वतःच प्रवेश करणार. अशीच माझी श्रद्धा आहे. कुणी त्याला भ्रम म्हणतील, कुणी अभिमान म्हणतील. त्याचें विश्लेषण कसेंहि करावें, पण मला वाटतें कीं धर्म-स्थापना होऊन राहिली आहे; नवीन धर्म स्थापन होत आहे. या दोन महिन्यांत मला ही भाषा सुचली. मध्यंतरीं ओरिसाचे कार्यकर्ते आले होते, त्यांच्या समोर मीं म्हटलें कीं अजूनपर्यंत धर्म बनला नाहीं, श्रद्धा बनली. जिला इंग्रजींत 'फेथ' (Faith) म्हणतात. श्रद्धा बनली ही मोठी कमाई आहे. तिच्या आधारावर पुढें जातां येईल. पूर्वीं मला वाटायचें कीं आजवर अनेक धर्म बनले, आतां त्यांचा समन्वय, मेळ, करायला हवा. पण आतां मला वाटतें कीं धर्म बनलेच नाहींत. अजून घर बांधायचें आहे. ९०° ऐवजीं ८८° कोनांत भिंत बांधली तर ती भिंत होईल. पण भिंत बांधायची म्हणजे ९०° तच बांधायला

हवी. पूर्वीं लोकांनीं भिंती बांधण्याचे वेडेवाकडे प्रयत्न केले असतील, पण आतां विज्ञानानें हें ठरलें कीं घर बांधायचें असेल तर ९०° चा कोन करूनच भिंत बांधायला हवी. तसें धर्मांत काय ठरलें? सत्य बोलल्यानें लाभ होतो हें काय पक्कें ठरलें? नाहीं, अजून पक्कें ठरलें नाहीं. अनेक प्रसंगीं खोटें बोलल्यानें लाभ होतो, असें लोकांना वाटतें. गवंड्यांना असा बिलकुल भास होत नाहीं कीं कांहीं प्रसंगीं ८८° चा कोन चालेल.

भिंत बांधण्याचें शास्त्र झालें आहे, तसें सत्याचें शास्त्र अजून बनलें नाहीं, लबाडीनें, दुटप्पी वागण्यानें, साशंक बोलण्यानें, लाभ होईल असें लोकांना वाटतें. साधारणपणें सत्य बरें, असें वाटतें. म्हणजे ही एक अव्यक्त श्रद्धा झाली, पण धर्म नाहीं बनला. तो अबाधित नियम नाहीं. व्यापारांत खोटें बोलावें लागतें, असें म्हणतात. राजकारणांत तर खोटें बोलणें योग्यच आहे; न बोलल्यास राष्ट्राचा घात होईल, असें लोकांना वाटतें. लढाईत तर Camouflage पाहिजेच. जसा बाबाचा पडाव केव्हां कुठें तें आधींच जाहीर होतें, तसें कुठें हल्ला करायचा तें आधीं जाहीर करून का लढाई होईल? लढाईत तर एक बोलणें व दुसरें करणें पाहिजेच; असत्य पाहिजेच. म्हणजे जीवनाचीं किती क्षेत्रें आहेत कीं ज्यांत असत्य आवश्यक वाटतें तें पाहा. पण सामान्यतः सत्य ठीक असें मानलें जातें. हिंदु, मुसलमान, खिस्ती, बौद्ध वगैरे सर्व धर्मांत हें असें आहे, आणि या सगळ्या धर्मांनीं सारें जग व्यापून टाकलें आहे. व्यवहाराच्या क्षेत्रांत थोडें सत्य व थोडें असत्य हवें असें सारे धर्म समजतात. नेहमीं सत्यच चांगलें हें कांहीं अजून शास्त्रीय प्रमेय बनलें नाहीं. एखादे वेळीं चुकून ८८° च्या कोनाच्या भिंतीचें घर बांधलें जाईल. पण जाणून बुजून ८८° च्या कोनाची भिंत बांधतां येईल असें गवंड्याला वाटत नाहीं. अजून सत्याचें तसें प्रमेय बनलें नाहीं.

### *श्रद्धा बनली, धर्म बनला नाहीं*

लहान मुलांना मारूं नये हें देखील प्रमेय कुठें बनलें आहे? लहान मुलांची आई-बापांवर केवढी श्रद्धा असते! जर आई म्हणाली कीं हा चंद्र आहे तर मूल मानतें कीं हा चंद्र आहे, व जर आई म्हणाली कीं हा सूर्य आहे तर तें मानतें कीं हा सूर्य आहे. अशा मुलांनाहि आई-बाप मारतात. प्रेम हें सामान्यतः असावें. पण मुलाला मारणें योग्य, असें आई-बाप समजतात. जर मुलांना प्रसंगीं मारणें

योग्य, तर शत्रूला प्रसंगीं शस्त्रांनीं मारणें कां अयोग्य? लोक म्हणतात कीं, मुलांना फार झोडपूं नये, पण थोडेंसें मारलें म्हणजे बरें असतें. जर मुलांना थोडेंसें मारणें बरें असतें, तर राजकारणांत, युद्धांत मुळींच हिंसा करूं नये हें कसें शक्य आहे? साम, दाम, दंड, भेद—असें म्हटलें जातें. त्यांत प्रथम साम आहे हें मान्यच आहे. प्रथम सामोपचारानें काम करावें व त्यानें नाहीं भागलें तर दंड आहेच. घरांत जर सामानें काम होत नाहीं, तर बाहेर कुठून होणार? मुत्सद्दीसुद्धां प्रथम सामानेंच काम करण्याचा प्रयत्न करतात. पण त्यानें नाहीं झालें तर मग दंडाचा प्रयोग करतात. मुलाला मारून काम होतेंच का? दंडानें अचूक काम होतेंच का? दंड म्हणजे चांगला असें मानव म्हणत नाहीं, पण दंड चांगला नाहीं ही त्याची श्रद्धा बनली आहे असें म्हणतां येत नाहीं. अहिंसा, प्रेम वगैरे विषयीं सामान्य श्रद्धा आहे. पण त्याचा Law (नियम) बनला नाहीं, अबाधित तत्त्व बनलें नाहीं. अजून प्रयोग चालू आहे. याचा अर्थ असा कीं, धर्म बनला नाहीं. धर्म ज्या दिवशीं बनेल त्यानंतर मग डोळे मिटून पाऊल टाकतां येईल. एकदां रस्ता ठरला कीं मग गति कमी जास्त असण्याचाच प्रश्न उरतो.

### *विज्ञान धर्माला मारक नाहीं*

अजून धर्मस्थापना झाली नाहीं. तद्विषयक प्रयत्न झाले आहेत. धर्मस्थापना झाली नाहीं याचीं अनेक कारणें आहेत. एक कारण असें कीं बुद्धि अव्यापक आहे. प्राचीन काळीं कांहीं ऋषींना अतींद्रिय ज्ञान व्हायचें. तुकारामाला विचारलें, कीं तूं कुठें राहतोस? तेव्हां तो म्हणायचा : 'आमुचा स्वदेश। भुवनत्रयामध्यें वास।' त्याचा मानसिक आशय इतका व्यापक होता! आणि आजकाल स्थिति अगदीं उलट आहे. अनेक भाषा जाणणारे, जग हिंडून आलेले, दुनियेचा इतिहास-भूगोल जाणणारे, यूनोंत जाऊन संकुचित भाषा बोलतात. तुकारामाला दुनियेचा इतिहास-भूगोल माहीत नव्हता; तरीहि त्याचा आशय व्यापक होता. प्राचीन काळीं व्यापक आशय असणारे असेच कांहीं लोक असत. लोक त्यांना विचारायचे कीं, 'तुला हें कसें कळलें?' ते म्हणायचे, 'समाधींत कळलें.' लोक त्यावर श्रद्धा ठेवायचे. पण ती श्रद्धा वेगळी आणि दोन आणि दोन चार होतात ही गोष्ट वेगळी. आपण युक्लिडच्या सिद्धान्तावर श्रद्धा नाहीं ठेवीत? तें एक सिद्ध झालेलें प्रमेय आहे. तसें अजून इतर बाबतींत सिद्ध झालें नाहीं. महापुरुषांनीं

सांगितलें म्हणून मानून घेतलें एवढेंच. परंतु विज्ञानानें आतां अशी शक्ति आली आहे कीं सामान्य माणसालाहि व्यापक दर्शन होणें शक्य आहे. पूर्वी फक्त असामान्यालाच तें शक्य होतें. अडीच हजार वर्षांपूर्वी बुद्ध भगवान् गया-काशीपासून नेपाळच्या सीमेपर्यंत—म्हणजे आजचे जवळ जवळ पंधरा जिल्हे हिंडले. ते सतत पंचेचाळीस वर्षें हिंडत होते. तरी त्यांच्या हिंडण्याचें काय झालें याचा केरळला पत्ता लागला असता का ? पण आज भूदानयज्ञ म्हटलें म्हणजे हिंदुस्थानांतच नव्हे तर जगांत विचार सुरू होतो. आज एखाद्या मुद्द्यावर सबंध जगांतल्या बुद्धिमंतांची बुद्धि काम करते. म्हणून आतां बाह्यतः अव्यापकता उरणार नाहीं. ती गोष्ट धर्मस्थापनेला मदत करील.

पुष्कळांची अशी समजूत असते कीं विज्ञान धर्माला मारतें. ही अगदीं कांहींच्या बाहीच समजूत आहे. क्लोरोफॉर्मचा शोध धर्माला कसा मारील ? उलट त्यानें भूतदया वाढेल. व्यापक ज्ञानानें जो धर्म मरतो, तो अज्ञानरूपच आहे. म्हणून जो खरोखरच धर्म आहे तो विज्ञानानें मरणार नाहीं.

### *विज्ञानानें व्यापकता आली*

आज विज्ञान आमच्या डोक्यावर व्यापकता लादून राहिलें आहे. पण आमचीं मनें मागासलेलीं आहेत, बुद्धि पुढारलेली आहे. पण मनाचें राज्य चाललें आहे. म्हणून आपण कुठें तरी मधले इतिहास Middle ages वाचीत बसतों. हे इतिहास बुद्धीला दाबतात. मला तर इतिहासापेक्षां कादंबरीच आवडते. कादंबरी-वाला सरळ ‘ हें झालें नाहीं ’ म्हणून सांगतो, पण हा इतिहासवाला ‘हें असें झालें ’ असें म्हणून लबाड लिहितो. कादंबरीवाला खरेपणाचा दावाच करीत नाहीं. पण इतिहासवाला खरेपणाचा दावा करून खोटें लिहितो, म्हणून लोकांची मनें तदाकार बनतात. पाकिस्तानचीं सारीं वर्तमानपत्रें नेहरू म्हणजे आपला शत्रु समजतात. आपल्याकडचे लोक मुसलमानांना शत्रु समजतात. काश्मीरचा प्रश्न घ्या, दुसऱ्याची मागणी कांहीं योग्य असूं शकेल असा कोणी विचारसुद्धां करीत नाहीं ! आतांच S. R. C. चा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतरच्या घटना बघा. सगळ्या कानडी लोकांचें हेंच मत कीं, बल्लारी कर्नाटकांत आहे. म्हणजे एका सबंध कम्युनिटीचें एक मत व दुसऱ्या सबंध कम्युनिटीचें दुसरें मत. म्हणजे त्या लोकांना Objective thinking उरलेंच नाहीं. तिकडे तो तामीळवाला गातो कीं, ‘ तिरुपतीपासून कन्याकुमारीपर्यंत तामीळ प्रांत आहे.’ आतां तिरुपति गेला

आंध्रांत; पण हा माणूस काव्य शिकला आहे. म्हणून याच्या मनानें ठरविलें कीं, तिरुपति तामीळनाडमध्यें आहे! तिकडे कन्याकुमारी म्हणजे अगदीं सर्वस्व वाटतें. आतां नवीन रचनेंत कन्याकुमारी तामीळनाडमध्यें गेली, तर सबंध केरळ दुःखी झाला. म्हणजे एकाच्या दुःखांत दुसऱ्याचें सुख आणि एकाच्या सुखांत दुसऱ्याचें दुःख!

### *मनाच्या भूमिकेवरून वर जायला हवें*

हें सारें अशामुळें होतें कीं, विज्ञानानें जी व्यापकता यायला हवी अशी अपेक्षा होती, त्या भूमिकेंत मनें गेलीं नाहींत. अजून मनाच्या भूमिकेवरच विचार होतो. जोंवर मनाच्या भूमिकेवरच विचार होतो तोंवर विज्ञानाच्या युगांत राहायला आपण लायक कसे ठरणार? तोंवर प्रगति होणार नाहीं. उपनिषदांत म्हटलें आहे; "अन्नं ब्रह्मेति, प्राणो ब्रह्मेति, मनो ब्रह्मेति, विज्ञानं ब्रह्मेति, आनंदं ब्रह्मेति ॥" मानसशास्त्र कसें पुढें पुढें जातें हें उपनिषदांनीं सांगितलें आहे. प्रथम अन्न येतें. जन्माला आल्यावर मुलाला प्रथम कोणती गोष्ट कळते? स्तनपान. अन्नाशिवाय त्याला दुसरें कांहीं माहीत नसतें. मग त्याचे डोळे, कान वगैरे विकसित होतात. मग पुढें मन येतें. त्यानंतर बुद्धि. आणि शेवटीं सगळ्यांचा मेळ होतो तेव्हां आनंदाची अनुभूति होते. जोंपर्यंत सुसंगति नाहीं तोंपर्यंत आनंद नाहीं. याच्याशीं विसंगत असें असेल तर मग आनंद नाहीं. सृष्टींत सर्वत्र सुसंगति आहे याची अनुभूति म्हणजे आनंद! आज विज्ञानाच्या भूमिकेवर राहा असें मानवाला युग सांगत आहे. विज्ञान म्हणजे मानवाचेंच कर्तृत्व. तेव्हां त्याचेंच कर्तृत्व त्याला हें सांगत आहे! पण तो आहे मनाच्या भूमिकेवर. म्हणून फार मोठी विसंगति निर्माण झाली आहे. त्यामुळेंच लढाई, झगडे वगैरे चालले आहेत. आतां मनाच्या भूमिकेवरून वर जायला पाहिजे.

### *महाराष्ट्रानें मनाला प्राधान्य देऊं नये*

ज्या लोकांचीं मनें प्रधान असतात, ते बलवान् असले तरी मागसतात. महाराष्ट्रांतील लोकांचें मन बलवान आहे. त्याच्या मागें एक इतिहास आहे, याची त्यांना जाणीव आहे; Consciousness आहे. Long Memories आहेत. त्याची आठवण दीर्घ राहते. ही सारी मनाची भूमिका आहे. म्हणून एखादी गोष्ट पटून सुद्धां मन कबूल करीत नाहीं. यांतून महाराष्ट्राची आणि

मग देशाची सुटका झाली तर फार सुसंवादी राष्ट्र निर्माण होईल. कार्यकर्त्यांचा आपापसांत मेळ जमत नाहीं असें म्हणतात. याचें कारण असें कीं, आपण कांहीं गोष्टींना फाजील महत्त्व देतों. Sense of Proportion राहत नाहीं. हें सारें मनाच्या भूमिकेवरून होतें. एकदां हें जेव्हां लक्षांत येईल कीं, साऱ्या लहान लहान गोष्टी विज्ञानाच्या भूमिकेंत टिकत नाहींत, जो मनाच्या भूमिकेंत राहील तो मार खाईल, तेव्हां मग सर्व ठीक होईल. महाराष्ट्रांत कांहीं बिघडलेलें नाहीं. त्याचें मन प्रधान आहे. त्याच्या पाठीशीं इतिहास आहे. त्या इतिहासाचें स्मरण त्याला स्फूर्ति देतें. त्या स्फूर्तींत कांहीं चांगल्या गोष्टी आहेत व कांहीं वाईट आहेत. चांगलें काय व वाईट काय याचें विश्लेषण करायला बुद्धि पाहिजे. ती नाहीं. बघतां बघतां आमच्यांतले प्रश्न मराठी विरुद्ध गुजराती, हिंदु विरुद्ध मुसलमान, कन्नड विरुद्ध तेलगू असें रूप घेतात. याचें कारण असें कीं, विश्लेषणबुद्धि नाहीं. म्हणून बरें वाईट सगळ्यासकट जें कांहीं आहे तें माझें आहे असें आम्ही मानतों.

हें जें 'मी'पण आहे, त्याला लोक 'अस्मिता' म्हणतात. योगशास्त्रांत अस्मिता हा शब्द अगदीं वाईट समजला जातो. त्यांत म्हटलें आहे कीं, माणसाला पांच क्लेश असतात. त्यांतून तो सुटला कीं मुक्त झाला. ते पांच क्लेश म्हणजे "अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश". यांतला अस्मिता हा वाईट शब्द या लोकांनीं उचलला! मला याचें हंसू येतें. कारण ती एक शिवी आहे. 'कोऽस्मि?' जसा कांहीं बरा वाईट असेन तो. त्या सगळ्यासकट मी चांगला! हे लोक आमची अस्मिता चांगली आहे असें म्हणतात. अभिनिवेशाला सुद्धां हे लोक चांगला म्हणतात. आतां अविद्येलाच फक्त चांगलें ठरवायचें राहिलें आहे!

महाराष्ट्रांतले लोक म्हणतात कीं, 'आम्हांला पूर्वीचा इतिहास आहे.' कां तो टिचभर पूर्वइतिहास घेऊन बसलांत? हे लोक म्हणतात कीं, 'आमची मराठी भाषा बाराशें वर्षांपूर्वींची आहे. तेथून आमचा इतिहास सुरू होतो.' पण कां रे, बाराशें वर्षांपूर्वीं तुझा जो पूर्वज होता त्याचाहि कोणी बाप होता कीं नाहीं? कीं त्याला बापच नव्हता? मग बाराशें वर्षांतच हें गाडें कसें आटोपलें? त्याच्याहि मागें जा आणि चला अनादि कालपर्यंत. लो. टिळकांनीं म्हटलें आहे कीं, 'आपले पूर्वज उत्तर ध्रुवाकडून आले.' मग देशाचा अभिमान काय राहील? पण त्यांना जगाचा प्रवाह जो दिसला त्याप्रमाणें त्यांनीं लिहिलें. परंतु संकुचित दर्शनामुळें आम्हांला वाटतें कीं इथूनच आमचा प्रवाह सुरू झाला! व्याकरणशास्त्र,

गणितशास्त्र, इत्यादि शास्त्रें खूप व्यापक बनविणारीं असतात. भाषाशास्त्र पाहिलें म्हणजे कळतें कीं शब्द कसे दूर दूर जातात! शास्त्रें माणसाला व्यापक बनवितात. पण काव्य, साहित्य, माणसाच्या मनांतून निर्माण होतें. त्यांत चांगलें वाईट दोन्ही असतें. कारण त्यांत मन प्रधान असतें. यांतून आम्हां लोकांची सुटका झाली पाहिजे.

## *यापुढें राष्ट्रांच्या सीमा टिकणार नाहींत*

एकदां ही भूमिका ध्यानांत आली कीं, धर्मस्थापना अजून व्हायची आहे, मनाच्या भूमिकेच्या वर जायचें आहे, शस्त्रास्त्रें वगैरे साधनें आतां बेकार झालीं आहेत, म्हणजे आपण बदलून जाऊं. ज्याला हें कळलें कीं आतां हें पाणी आटणार आहे, त्याची भूमिका वेगळी होईल. पण त्या पाण्यांतल्याच माशाला तें दिसत नाहीं. मग आटल्यानंतर मात्र तो तडफडणार! हें मी अनुभवानें सांगतों आहें. आम्ही साबरमतीला असतांना रोज नदीवर जात असूं. उन्हाळा येत चालला तेव्हां त्या वेळीं नदीचे दोन प्रवाह झाले होते व मध्यें एक हातभर खोल जलखंड राहिला होता. मी रोज बघायचा कीं हें जलखंड आटतें आहे. पण त्यांत राहणाऱ्या माशांना अक्कल नव्हती, कीं हें आटणार आहे. त्यांना दुसरी गतीच नव्हती. तें आटल्यानंतर मासे तडफडून मरतील, या विचारानें मला त्यांची दया आली व काठीनें मी तो जलखंड एका प्रवाहाशीं जोडला. त्याबरोबर ते मासे एका प्रवाहाकडे धांवले. अजूनहि तें दृश्य माझ्या डोळ्यासमोर दिसतें. अल्प पाण्यालाच ते प्रवाह समजत होते! आपण मूळ प्रवाहापासून तुटलों आहोंत, हें त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं.

या S. R. C. च्या रिपोर्टच्या वेळीं आपण लोकांनीं इतिहास-भूगोलाचा जितका अभ्यास केला तितका पूर्वीं कधीं केला नसेल! आणि इतकें असूनहि 'भारतांत राहणार का?' असा प्रश्न विचारला तर तामीळनाडमधले कांहीं लोक सोडले तर बाकीचे 'हो' म्हणतात. म्हणजे अजून थोडा तरी Sense of proportion शिल्लक आहे. थोड्याच दिवसांत हें सर्वांच्या लक्षांत येईल कीं भारत ही छोटी गोष्ट आहे. जगभर सर्वत्र जमिनी मोकळ्या झाल्या पाहिजेत. चीन आणि जपानमध्यें जमिनी कमी आहेत व लोकसंख्या जास्त आहे. त्यांची जमिनीची गरज मान्य करून जगाची योजना होईल. ऑस्ट्रेलिया वगैरे जास्त जमिनीच्या देशांत त्यांना जमीन दिली जाईल, तरच मानवता टिकणार आहे. आज राष्ट्रांच्या ज्या सीमा आहेत त्या टिकणार नाहींत. त्यांचा लोप व्हावयाचा आहे. पण आपण डोळे मिटून बसतों व जुनें घेऊन चालतों.

असें म्हटलें जातें कीं पाकिस्तानच्या हिश्श्यांत काश्मीरचा जो भाग आहे तिथें फारसें सुख नाहीं व हिंदुस्थानच्या हिश्श्याच्या भागांत सुख आहे. तरी पण सार्वमत झालें, तर पुन्हां हिंदु-मुसलमान असें कांहीं होईल का ? व त्यामुळें पुन्हां हिंदुस्तान व पाकिस्तानांत मारामाऱ्या, हलकल्लोळ होईल कीं काय, अशी भीति वाटते. त्यामुळेंच काश्मीरचा प्रश्न कठीण झाला आहे; काश्मीरनें हिंदुस्तानांत जायचें कीं पाकिस्तानांत इतका सरळ तो प्रश्न नाहीं. नुसतें वरवर पाहून हें ठरवितां येणार नाहीं. तो प्रश्न कठीण झाला आहे; कारण अजून मनें जुनीं आहेत; मनें विज्ञान-युगाला अनुकूल नाहींत. आज जर लाठीसारखीं जुनीं साधनें असतीं तर कांहीं हरकत नव्हती. त्यामुळें फार तर चार डोकीं फुटलीं असतीं. पण चार फुटलीं तर उरलेलीं ठिकाणावर येतात! पण आतां साधनें इतकीं मोठीं निर्माण झालीं आहेत कीं, संहारच व्हायची भीति आहे.

## ग्रामदान 'अभयकारी' आहे

आपण ग्रामदानाचें काम करतों. त्यांत एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवायला हवी कीं, ग्रामदानांत कुणालाहि भय नाहीं, हें सर्वांना समजावून सांगायला हवें. ग्रामदान हें 'अभयकारी' आहे. जर कुठें भय असेल तर तें आजच्या व्यवस्थेंत आहे. पण आजकाल असें होतें कीं ग्रामदान म्हटलें कीं कांहीं लोकांना भय वाटतें. मग पन्नास अनुकूल पांच प्रतिकूल हें सुरू होतें. याचें कारण असें कीं, लोकांना ग्रामदानाचा खरा अर्थ कळला नाहीं. पुष्कळांना वाटतें कीं, ग्रामदान म्हणजे मोठ्या लोकांनीं जमिनी द्यायच्या. असें वाटत असेल तर मग वर्गसंघर्ष—Class War—होऊं नये म्हणून कितीहि प्रयत्न केला तरी दृष्टि संकुचित असल्यामुळें आपल्या कामाला तेंच स्वरूप येणार आणि मग तें भयस्थान होणार. पण ग्रामदान तसें नाहीं. तें अभयकारी आहे.

कांहीं लोक म्हणतात कीं, कार्यकर्ते जेव्हां ग्रामदानाचा विचार सांगतात तेव्हां लोक त्यांना विचारतात, 'तुम्हीं काय त्याग केला ?' परंतु लोकांना हें सांगायला हवें कीं, हा त्यागाचा प्रश्न नाहीं, यांत सर्वांनीं मिळून भोगायचें आहे. तुम्ही सारे कार्यकर्ते जर जीवश्च कंठश्च मित्र आहांत असें लोकांना दिसलें तर सारे विरघळले म्हणून समजा! लोकांना हेंच सांगायचें कीं, आम्ही प्रेम करतों तसेंच तुम्ही करा. त्याग म्हटला म्हणजे त्याचें माप काय ? तेव्हां लोकांना हें सांगायचें कीं आम्ही सर्व मिळून एकवटून राहतों, तसे तुम्ही एकवटा. त्यामुळें तुमचें

जीवनमान व चिन्तनमान वाढेल. यांत सारें वाढायचेंच आहे, घटायचें कांहीं नाहीं. हें असें सगळें कळलें म्हणजे मग 'आम्हांलाच कां त्याग करायला सांगतां?' असें कोणी म्हणणार नाहीं. तुम्हां कार्यकर्त्यांत खूप प्रेम असेल, Sense of ownership (मालकीची भावना) नसेल तर त्याचा परिणाम दिसेल.

## *महाराष्ट्रांत व्यक्तींशीं चर्चा करीन*

मला महाराष्ट्रांत Heart to heart talk हवा आहे, तसें रोज सार्वजनिक व्याख्यान होईलच. पण मी वक्ता कुठें आहें? मी एकदां वक्तृत्वावर पुस्तक वाचलें होतें. त्यांत लिहिलें होतें कीं वक्त्याला हावभाव, गळा वगैरे कितीतरी गोष्टी लागतात. वक्तृत्वानें का आपण महाराष्ट्र जिंकणार आहोंत? महाराष्ट्रांत मला प्रत्येकाशीं अगदीं मनमोकळें बोलायचें आहे. कोणाला काय वाटतें तें त्यानें मनमोकळेपणानें मांडावें. मग त्यावर तटस्थपणें चर्चा होईल. अमक्याचा विचार वाईट असें मानतां कामा नये. तो विचार जर वाईट आहे तर मग तो त्याविषयीं इतका आग्रह कां धरतो? माणसांना इतक्या विपरीत विचाराविषयीं आग्रह कां वाटावा? त्याना आग्रह वाटतो कारण त्या विचारांत कांहीं सत्यांश असतो व तेवढ्या अंशाभोंवतीं बाकीचें सगळें गोळा होतें. एक माणूस चांगला असला तर आपण त्याच्या परिवारांतल्या इतर, माणसांना सहन नाहीं का करीत? तसेंच कोणाच्याहि विचारांत एक सदंश असतो व त्याला असदंश चिकटून बसलेला असतो. जर आपल्याला तेवढा सदंश ग्रहण करतां आला तर जिंकलेंच म्हणून समजा. आणि तो जर ग्रहण-केला नाहीं तर त्यांतला तो असदंशहि टिकून राहील.

महाराष्ट्रांत माणसाशीं चर्चा करायची, एकमेकांपासून सत्य समजावून घ्यायचें अशी माझी भूमिका राहील. नुसतें भूदान, ग्रामदान नव्हे, तर ज्याविषयीं मला थोडेंबहुत ज्ञान आहे अशा सर्व विषयांवर चर्चा करायला मला हरकत नाहीं. चर्चेची अगदीं Endless Process झाली तरी हरकत नाहीं. मीं मागें म्हटलेंच आहे कीं, महाराष्ट्रांत मला केवल होऊन, मोकळें होऊन यायचें आहे. चर्चा करून सत्य सांपडतें का तें पाहायचें आहे, असें म्हटलें म्हणजे पुष्कळसे वाद मिटतील.

## *महाराष्ट्रांत संघटना नको*

एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं, महाराष्ट्रांत कोणींहि संघटना करूं नये. माझा संघटनेवर विश्वास नाहीं, ती गोष्ट वेगळी. पण महाराष्ट्रांत संघटना करूं नये,

कारण एक संघटना उभी झाली कीं त्याविरुद्ध दुसरी उभी झालीच म्हणून समजा. म्हणून महाराष्ट्रांत तुम्ही इतिहाससंशोधन करा पण 'इतिहास संशोधक मंडळ' काढूं नका. महाराष्ट्रांत मोकळा विचार सांगायला हवा. तुम्ही कोणत्या पंथाचे, पक्षाचे आहांत तें मी जाणणार नाहीं. तुम्ही 'जन' आहांत असें समजून बोलेन.

आजपर्यंत इतिहासांत महाराष्ट्रावर ज्यांचा प्रभाव पडला ते संघटनेला कधीं वश झाले नाहींत. वारकऱ्यांची यात्रा सहजगत्या प्रेमानें चालत असे. पुढें कदाचित् त्यांत संघटनेचें स्वरूप आलें असेल, पण ज्ञानदेव हा मुळींच संघटन करणारा माणूस नव्हता. संघटनेचा मोह मोठ्यामोठ्यांना झाला, महंमदाला झाला, नानकाला झाला. नानकाला महंमदापेक्षां कमी प्रमाणांत झाला. त्यांतून मुक्त असणारीं माणसें थोडींच आहेत. ज्ञानदेव त्यांतून मुक्त होता. त्याला गुरु होता. पण त्यानें जें लिहिलें तें निरुपाधिक होऊन लिहिलें. ज्ञानेश्वरीपेक्षांहि अमृतानुभवांत उपाधि मुळींच नाहीं. अमृतानुभवांत त्यानें आपल्या एका वाक्याला गीतेचा व शिवाचा आधार दिला. म्हटलें कीं, 'शिवानें व गीतेनें सांगितलें, म्हणून मी हें खरें मानतों असें नाहीं, त्यांनीं सांगितलें नसतें तरी मीं खरें मानलें असतें, कारण हें प्रमेय खरें आहे......हें मन मुक्त स्थितींतलें आहे.' असें कांहीं मन महाराष्ट्रांत आहे, ज्याचा त्यावर प्रभाव आहे. महाराष्ट्राच्या मनावर परिणाम करणारी शक्ति म्हणजे ज्ञानदेव आहे, दुसरी नाहीं. महाराष्ट्राला तें एक फार मोठें आशास्थान आहे. कार्यकर्त्यांनीं या सर्वांचें अध्ययन करायला हवें. संतांनीं कांहीं कांहीं असे सूक्ष्म विचार केले आहेत कीं वाचून आश्चर्यच वाटतें. उदा. तुकारामाचें हें वाक्य पाहा: '**अणूरणीया थोकडा। तुका आकाशाएवढा.**' आंध्रमध्यें गोरा नांवाचा एक नास्तिक कार्यकर्ता आहे. त्याला मीं तुकारामाचें एक असें वचन सांगितलें कीं तो थक्कच झाला.—"**आहे ऐसा देव वदवावी वाणी। नाहीं ऐसा मनीं अनुभवाव ॥**" इतका अप्रतिम विचार इतरत्र क्वचितच आढळेल; त्यांत ज्यानें म्हटलें आहे कीं अस्ति आणि नास्ति या सुद्धां वादाच्या दोन शाखा आहेत. त्यापलिकडेहि कांहीं प्रमेय आहे. ......असें कांहीं मन महाराष्ट्रांत आहे. त्याचा आपल्याला आधार मिळूं शकतो. आणि दुसरा आधार म्हणजे आधुनिक विज्ञानाचा. हे दोन आपले आधार आहेत, हें लक्षांत ठेवा.

# दुधांतील साखर बना*

आपला हा भारतदेश विविध रत्नांची खाण आहे. त्यामध्यें महाराष्ट्र हेंहि एक रत्न आहे. ज्या प्रांतांत तुम्ही आज आहांत तो कन्नड देश, हाहि एक रत्न आहे. अशीं निरनिराळ्या प्रकारांचीं, नाना रंगांचीं मनोहर रत्नें भारताच्या खाणीमध्यें आहेत. आणि त्या सर्वांचा मिळून हा महाभारत देश बनला आहे. या सबंध देशामध्यें इतकी विविधता असूनहि आश्चर्याची गोष्ट अशी कीं विलक्षण भावनात्मक एकता साऱ्या भारतामध्यें दिसून येते. जगाच्या पाठीवर आज हाच असा एक देश आहे कीं ज्या ठिकाणीं उत्तम विकसित झालेल्या बारा, चौदा भाषा नांदतात. कारण चीन देश जरी आपल्यासारखा विशाल आहे, तरीपण तिथें भाषा एकच आहे. ठिकठिकाणीं लोकांच्या बोलण्यांत प्रांतीय भेद आहेत, पण ते एकाच भाषेंतले भेद आहेत. रशियांत अनेक भाषा आहेत, पण तिथें रशियन भाषा हीच एक समर्थ भाषा आहे. बाकीच्या भाषा तितक्या समर्थ व विकसित नाहींत. यूरोपांत भारताप्रमाणें अनेक विकसित भाषा आहेत. पण त्या सगळ्या भाषांचा मिळून त्यांनीं एक देश बनविला नाहीं. प्रत्येक भाषेचा एक स्वतंत्र देश बनविला आहे. जर्मन व फ्रेंच या भाषा इतक्या जवळ जवळ आहेत कीं कोणीहि फ्रेंचमन जर्मन भाषा व जर्मन माणूस फ्रेंच भाषा पंधरा दिवसांत शिकूं शकेल.

मीं लहानपणीं फ्रेंचचा अभ्यास केला होता. आणि अलिकडे जर्मनचाहि अभ्यास केला. इंग्रजी तर मला पूर्वीपासून अवगत होतीच. लॅटिनहि मी जाणतों. त्या सगळ्यांची तुलना करून मी सांगतों कीं या सगळ्या भाषा इतक्या जवळ जवळ आहेत कीं एक भाषावाला दुसरी भाषा पंधरा दिवसांत शिकूं शकेल. त्या सर्व भाषांची लिपि एकच आहे. आपल्याकडे कन्नड, तामीळ, तेलुगु, मल्याळम्, गुजराथी, हिंदी, बंगाली, काश्मिरी इत्यादि सर्व भाषांच्या वेगवेगळ्या लिप्या आहेत. फक्त हिंदी, मराठी व संस्कृतची एक लिपि आहे.

* 'महाराष्ट्र-मंडळा'समोर दिलेलें भाषण: हुबळी, जि. धारवाड, ता. २८-१-१९५८.

आपल्याकडे धर्मभेदहि आहेत, जे युरोपांत नाहींत. तिथें Christianity हा एकच धर्म आहे. इतकें असूनहि त्यांनीं भाषेगणिक अलग राष्ट्र बनविलें आहे. यूरोपांत चार कोटींचे, पांच कोटींचे असे लहान लहान देश आहेत. तेव्हां सबंध जगतामध्यें भारतदेश हेंच एक असें उदाहरण आहे कीं ज्या ठिकाणीं समर्थ, विकसित, जवळ जवळ समान योग्यतेच्या, बरोबरीच्या भाषा हजारों वर्षांपासून एकत्र नांदतात.

### *भारताची विशेषता : हार्दिक एकता*

आम्हीं हा भारतदेश एक मानला तो फार प्राचीन काळापासून. अलीकडे कांहीं प्रांतीयता दिसून पडते. परंतु ज्यावेळीं आगगाड्या वगैरे दळणवळणाचीं साधनें नव्हतीं त्यावेळीं भारताचे लोक सबंध भारताचाच अभिमान राखीत. ते म्हणत असत कीं 'दुर्लभं भारते जन्म' ते कांहीं 'दुर्लभम् महाराष्ट्रे जन्म', 'दुर्लभम् गुर्जरेषु जन्म' असें म्हणत नव्हते. इतकी आध्यात्मिक, भावनात्मक, हार्दिक एकता, एवढ्या मोठ्या प्रदेशांत, अनेक भाषा पोटांत जिरवून आम्हीं राखली! ही गोष्ट सबंध जगांत फक्त भारतांतच झाली! म्हणून या दृष्टीनें भारतदेश अनन्यसाधारण आहे. म्हणजे त्याची उपमा त्यालाच द्यायची. साहित्य-शास्त्रांत अनन्वय अलंकार नांवाचा एक अलंकार सांगितला आहे. 'रामरावणयोः युद्धम् रामरावणयोरिव'–रामरावणाचें युद्ध कसें झालें तर रामरावणयुद्धासारखें झालें. तसा इतक्या विविध समर्थ भाषांनीं नटलेला भारतासारखा देश सबंध जगांत भारतच आहे असें म्हणावें लागतें.

### *भारत फक्त विज्ञानांत मागासलेला*

याचा अर्थ असा कीं राजकारणाच्या, समाजशास्त्राच्या व आध्यात्मिक दृष्टीनें भारत विचारानें पुढें आहे. तो विज्ञानांत मात्र मागासलेला आहे. तें विज्ञान त्याला मिळविलें पाहिजे. पण विज्ञानाशिवाय इतर विचारांत भारत हा मागासलेला देश नाहीं. तो एक स्वयंसिद्ध देश आहे. भारतापाशीं असें कांहीं आहे कीं जें जगाला शोधावेंसें वाटतें. भारतांत येऊन शोध घ्यावा, कांहींतरी इथें सांपडेल अशा समजुतीनें आजपर्यंत दुसऱ्या देशांतील लोक कौतुकानें इथें येत आहेत. येथील लोकांच्या जीवनांत कांहींतरी आध्यात्मिक, पारमार्थिक, आहे अशी आशा ते बाळगतात. हें सगळें झालें खरें, पण कुणाच्या बळावर ? वडिलांच्या बळावर !

रामदासांनीं म्हटलें आहे कीं '**सांगे वडिलांची कीर्ति तो एक मूर्ख।**' माझा बाप लक्षाधीश होता अशी गोष्ट जर एखादा भिकारी हातीं झोळी घेऊन बोलूं लागला तर ती त्याला लज्जेची गोष्ट आहे. त्यापेक्षां त्यानें आपला बाप कोण होता हें न बोललेलें बरें. बापाचें नांव घ्यायचें तर हातीं भिक्षेची झोळी घेऊं नये. मीं जी भारताची ही सारी कीर्ति गाइली ती आपल्या पूर्वजांची होती, आपली नव्हे. इतक्या विविध भाषांना एकत्र कुणीं नांदवलें? साऱ्या भारताला एकता कुणीं दिली? आपल्या पूर्वजांनीं! बद्रीकेदारच्या माणसाला नेहमीं असें वाटत असे कीं मी केव्हां रामेश्वराला जाईन आणि गंगाजलानें रामेश्वराच्या देवाच्या मस्तकावर अभिषेक करीन! रामेश्वराच्या माणसाला सतत हीच तळमळ असे कीं कधीं मी काशीला जाईन आणि समुद्रजलानें विश्वनाथावर अभिषेक करीन! इकडच्या लोकांना तिकडे जायची ओढ आहे, तर तिकडच्या लोकांना इकडे जायची ओढ. आपण बोलतांना 'काशी-रामेश्वर' असें नेहमीं बोलतों. त्या दोन शब्दांत फक्त एक dash आहे. त्या डॅशची लांबी १२०० मैल आहे. इतका विशाल देश, जुन्या काळांतहि आपण एक मानला. सबंध भारत हें एक यात्रास्थळच बनलें. ठिकठिकाणीं जाऊन संतांचें दर्शन घेऊं या, ज्या भाषा समजत नाहींत त्या भाषांच्या मुलखांत जाऊं या, ही जी आपली आकांक्षा राहिली ती पूर्वजांच्या पुण्याईनेंच. साऱ्या भारताला त्यांनीं एक विचारक्षेत्र बनविलें.

## *सर्वांना सामावून घेण्यासाठींच जाती बनल्या*

'भारत' याचा अर्थ सर्वांचें भरण करणारा असा आहे. '**यारे या, सर्वांना इथें मोकळीक आहे.**' '**ऐशो हे आर्य, ऐशो अनार्य**' असें रविंद्रनाथांनीं गाइलें आहे. इथें कोण नाहीं आले? इथें जे जे आले ते सर्व कांहीं जिंकीत आले नाहींत. ख्रिश्चन इथें आले, ते कांहीं इंग्रजांच्या वेळीं नव्हे, तर येशू ख्रिस्तानंतर ५०–६० वर्षांतच ख्रिस्ताच्या बारा शिष्यांपैकीं एक शिष्य, सेंट टॉमस, मलबारच्या किनाऱ्यावर इसवी सनाच्या पहिल्या शतकांतच आला. तो इथें सैन्य घेऊन आला नाहीं. तर प्रेमानें आला. त्याला येथील लोकांनीं जागा दिली. त्यांनीं इथें मेरीचीं देवळें बांधलीं, मठ काढला. ही १९०० वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. तसेंच पार्शी इथें आले ते कांहीं हातीं तलवार घेऊन नाहीं आले. ते तर इथें आश्रय घेण्यासाठीं आले. त्यांना इराणांतून पळवून लावलें होतें, तिथून ते पळाले ते मुंबईच्या किनाऱ्यावर आले. आम्हीं त्यांना म्हटलें कीं

तुम्हीहि या. नंतर ते इथें प्रेमानें राहिले. साऱ्या हिंदुस्तानांत सव्वा लाख पारशी असतील, पण आम्ही minority आहोंत, आम्हांला रक्षण पाहिजे, असें त्यांनीं कधीं म्हटलें नाहीं. ते भारतांत आले त्या दिवसापासून त्यांना असेंच वाटलें कीं आपण इथलेच आहोंत. भारताला 'स्वराज्य' हा मंत्र देणारे दादाभाई नौरोजी हे पार्शी होते. ज्यांनीं मुंबईला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, ते फिरोजशहा मेहता पार्शी होते. ज्यांनीं एवढा मोठा टाटानगरचा लोखंडाचा कारखाना काढला ते जमशेटजी टाटा पार्शी होते. हीं सारीं लहान नांवें नाहींत. एवढ्या लहानशा पार्शी जातीनें देशाला कितीतरी मोठीं माणसें दिलीं. इथें यहुदीहि आले. ते इथें चुपचाप राहतात, कमाई करतात, कांहीं वाद नाहीं, झगडा नाहीं. भारतांत असे कितीतरी लोक आले. भारतांत निरनिराळ्या जाती बनल्या, त्यांत आज भेदभाव आहे. पण पूर्वीं त्या जाती निर्माण झाल्या त्या वेगळ्याच कारणामुळें. पूर्वीं कोणत्यातरी देशांतले लोक इथें आले तेव्हां त्यांच्यावर बहिष्कार घालण्याऐवजीं 'तुमची एक जात' असें करून करून जाती बनल्या. सर्वांनीं प्रेमानें, स्नेहानें नांदावें म्हणून जागा करून दिल्या. 'तुमच्या खाण्याच्या संवयी वेगळ्या आहेत तर ठीक आहे. तुम्ही अलग खा, अलग कॉलनी करून राहा.' अर्थात् आतां इतका अभेद झाल्यानंतर जाती शिल्लक राहणें चांगलें नाहीं. पण मुळांत सर्वांना एकत्र नांदवून घेण्याकरतांच जाती बनल्या. तुम्ही तुमचें जीवन जगा, आम्ही आमचें जगूं. आम्ही तुम्हांला त्रास देणार नाहीं, तुम्ही आम्हांला देऊं नका. अशा प्रकारचें Co-existence—सहजीवन—निर्माण करून भारतानें सर्वांना पचवून घेतलें.

### *'प्रेमशक्ति' ही भारताची शक्ति*

भारत हें एक असामान्यच राष्ट्र आहे. त्यांत अनेक जमाती एकवटल्या आहेत. म्हणून भारताची शक्ति म्हणजे 'प्रेमशक्ति' आहे. प्रेमाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि गुणानें भारत एकत्र नांदूं शकणार नाहीं. प्रेमाशिवाय एवढें मोठें कुटुंब एकत्र नांदेल का ? चार भावांच्या कुटुंबांतहि प्रेम नसलें तर एक एक भाऊ अलग होईल. भारत म्हणजे एक सामूहिक कुटुंब. अनेक धर्मांचे, अनेक जातींचे, अनेक भाषांचे, अनेक संस्कारांचे इतके विविध लोक एकत्र नांदायचे, हें प्रेमाशिवाय शक्य नाहीं. म्हणून भारताला परमेश्वर प्रेम करण्याची जबरदस्ती करीत आहे. तुम्ही प्रेम करा अथवा कायमचे पतित व्हा, असें परमेश्वराचें आम्हांला

आवाहन आहे. तुम्ही जर प्रेम करणार नसाल तर तुमची शक्ति कधींहि वाढणार नाहीं. भारत शक्तिशाली होणार नाहीं. परस्परांचे झगडे संपणार नाहींत. जातिभेद, धर्मभेद वगैरे भेद इथें होतेच. आतां नवीन भेद, पक्षभेद, निर्माण झाला आहे. त्या राजकारणांत एवढें काय आहे, तें मला कळतच नाहीं. गांवोगांवीं पक्षाच्या तत्त्वावर निवडणुका होतात, आणि झगडे वाढतात. भेदासुराला आतां हें एक नवीन डोकें आलें आहे. दशमुखी रावणाचीं दहा तोंडें अपुरीं पडलीं म्हणून तो अकरामुखी झाला. हे भेद जर वाढले आणि प्रेमतत्त्व राहिलें नाहीं तर भारत कधींहि सुखी होणार नाहीं. हा ईश्वराचा भारतावर अनुग्रह आहे, शाप नव्हे. तुमची फार मोठी खानदानी आहे, तेव्हां तुम्हीं एकत्र नांदायला हवें. एवढें मोठें राष्ट्र तुम्हीं कां केलें ? जर हे संयुक्त कर्नाटकवाले म्हणूं लागले असते कीं आम्ही भारतापासून अलग होणार तर त्यांचें तोंड आणि हात कोण धरणार होतें ? पण ते म्हणतात कीं आम्ही हिंदुस्थानांतच राहणार. आम्ही सर्व एकत्र राहणार असेंच सर्व प्रांतवाले म्हणतात. ही फार मोठी देणगी, पूर्वपरंपरा आपल्याला मिळाली आहे. ती सांभाळली पाहिजे. तेव्हां आपण प्रेमाला भारतापुरतें विकसित करून, तिथें थांबायचें नाहीं. तें प्रेमाचें भांडें पूर्ण भरून वाहूं लागलें पाहिजे. आणि प्रेम सारें जगांत पसरलें पाहिजे. आज कर्नाटकांतलीं लहान मुलें देखील फार मोठा शब्द बोलत आहेत—'जय–जगत्।' सबंध जगाचा जय होवो, म्हणून आम्ही प्रतिज्ञा करतों. ज्या प्रेमानें आम्ही सबंध भारत एकत्र नांदविलें, त्या प्रेमानें सारें विश्व एकत्र नांदवूं, ही प्रेमाची प्रतिज्ञा आम्ही घेत आहोंत. हें प्रेमतत्त्व आपल्याला तारील, दुसरें शहाणपण तारणार नाहीं. ती निवडणूक, घोटाळे तें कांहीं नको.

### *इलेक्शन लढूं नका; खेळा !*

तुम्ही लोक मूळचे महाराष्ट्रांतले. आतां इथें कर्नाटकांत राहतां. इथली हवा, पाणी, अन्न खातां. दुसऱ्या भाषेच्या मुलखांत तुम्ही राहतां तेव्हां तुमचें कार्य काय आहे ? अशा लोकांवर परमेश्वरानें मोठेंच काम सोंपवलें आहे; तें कार्य म्हणजे भेद मिटवून टाकायचे; शिल्लक नाहीं ठेवायचे. जसें रामानें रावणाचीं शिरें नाहींशीं केलीं आणि त्याला आपल्यांत अंतर्भूत करून घेतलें, रावणाची ज्योति रमांत समाविष्ट झाली तसें, इथें राहणाऱ्या महाराष्ट्रीय मंडळींना, आपण कर्नाटकपासून वेगळे आहोंत, असें मुळींच वाटतां कामा नये. भारतापासून तर आमचें

कांहीं वेगळेपण नाहींच. तुम्ही या प्रांतांत मुद्दाम आलां आहांत. मराठी साखर जी तिथून उठली ती या कर्नाटकांत कशाला आली? इथल्या दुधांत पडून, विरघळून जाऊन, त्या दुधाला गोड करण्यासाठीं. सगळ्यांनीं असें म्हटलें पाहिजे कीं हें कानडी दूध या मराठी साखरेमुळें फार गोड लागतें! हें कार्य आपल्याला इथें करायचें आहे. तसें आपण करूं शकलों तर यूरोपला धडा मिळेल. इतक्या सर्व भाषांचे लोक प्रेमानें कसे नांदतात तें पाहायला मिळेल. सगळ्या जगभर जीं भांडणें चालतात तीं उरणार नाहींत. भांडायचा अधिकार फक्त मुलांना आहे. कारण ती एका क्षणांत भांडण विसरूं शकतात. मोठे लोक भांडण विसरत नाहींत. कारण त्यांना शिंगें फुटलेलीं असतात! भांडण विसरतां आलें तर भांडणांत गोडी असते. ज्ञानदेवांनीं म्हटलें कीं भांडण भांडावें, पण कुणीं व कसें?—"**विठ्ठल रखुमाईचे भांडणीं। कोण करी बुझावणी। त्या विठ्ठल चरणीं। ज्ञानदेवो॥**"

ज्या ठिकाणीं अत्यंत प्रेम असतें त्या ठिकाणचें भांडण म्हणजे जशा समुद्रांत लाटा उसळतात, तसें असतें. एकेक लाट उसळते आणि खालीं पडते. आपला एवढा मोठा देश आहे, तेव्हां वाद होणारच. पण वाद आपण खेळूं या. आजकाल या लोकांनीं इलेक्शन काढलें आहे. मी त्याला 'विलक्षण'च म्हणतों. तें Fight करायचें असतें म्हणे! मी म्हणतों कीं इलेक्शन लढतां कशाला, खेळा. तुम्ही इलेक्शन खेळणार असाल तर मला तें मंजूर आहे. कुस्तीमध्यें जिंकणाऱ्याला इनाम मिळतें व जो पडला त्याला नारळ मिळतो, त्याचासुद्धां गौरव होतो. कारण तो जर पडला नसता तर हा चढला नसता! कुस्ती दोघे मिळून खेळतात. तो गडी नसता तर कुस्तीच झाली नसती. म्हणून ज्या दोघांनीं मिळून खेळ खेळला त्या दोघांचाहि गौरव होतो. अशामुळेंच कुस्तींत आनंद असतो. त्याप्रमाणें इलेक्शन खेळणार असाल तर आनंद येईल, त्यांत जो जिंकेल त्याला जनकाची पदवी देऊं; त्यानें राज्याच्या गादीवर बसावें आणि अलिप्तपणानें जगाच्या हितासाठीं राज्य चालवावें. जो हरेल त्याला शुकदेवाची पदवी देऊं. त्यानें गांवोगांवीं हिंडून लोक-सेवा करावी. याप्रमाणें हरणाऱ्यांनीं स्वतंत्र लोकसेवा करावी व जिंकणाऱ्यानें सत्तेच्या द्वारें लोकसेवा करावी. एकानें संघरचनेच्या द्वारें व दुसऱ्यानें प्रेमानें, अशी दोघांनींहि सेवा गाजवावी. आजकाल हे लोक इलेक्शन फाइट करण्याची भाषा बोलतात. हें असलें अभद्र आपल्या देशांत करायचें नाहीं. आपल्याला भांडण्याचा अधिकार आहे. एकत्र राहणारे भांडणार नाहींत तर काय दूर दूर राहणारे

भांडतील? भांडणालाहि प्रेम लागतें. आपला देश मोठा आहे, तेव्हां प्रश्नहि मोठेच्च असणार, मतभेदहि असणार. तेव्हां आपण भांडूं या; पण आंत, बाहेर, वर, खालीं सर्वत्र प्रेम राखूं या. प्रेमाशिवाय दुसरी गोष्ट बोलायची नाहीं. असें जर केलें तर भारत देश सबंध दुनियेचा सेवक, विश्वसेवक होऊं शकतो. अशी संधि भारताला गेल्या दोन हजार वर्षांत अशोकानंतर आजपर्यंत मिळाली नव्हती. ती आतां मिळाली आहे.

### *पार्टी म्हणजे पार्ट-तुकडा*

तुम्ही इथें राहणारे महाराष्ट्रीय लोक प्रेमासाठीं म्हणून एक व्रत घ्या, कीं राजकारणांत पडायचें नाहीं. पार्टी म्हणजे पार्ट-तुकडा, खंड. म्हणजे अभद्रच तें! आम्ही पूर्ण आहोंत, तुकडे नव्हे. आम्ही सर्वांची सेवा करणार. मी तुम्हांला पूर्णाची एक मौज सांगतों. एका कुटुंबांत मेजवानी होती. सगळे लोक जेवायला बसले होते. मेजवानीसाठीं लाडू केले होते. [कसले लाडू होते तें मला माहीत नाहीं, कारण मी त्या ठिकाणीं जेवायला गेलों नव्हतों!] वांटणाऱ्यानें बापाच्या ताटांत एक लाडू वाढला व मुलाच्या ताटांत अर्धा. तर मुलगा रडूं लागला. पूर्ण लाडू खाल्ल्यानें त्याला अपचन झालें असतें म्हणून अर्धा वाढला होता. पण त्याचें रडणें, ओरडणें थांबेना—जणूं Election चा कोलाहल! त्याला कितीहि समजावून सांगितलें तरी त्याची समजूत पटेना. त्याची आई शहाणी होती. तिनें एक लहानसा पूर्ण लाडू त्याच्या ताटांत वाढला. त्याबरोबर मुलगा खुष झाला. त्याला एवढें समजत होतें कीं बाप मोठा आहे म्हणून त्याला मोठा लाडू वाढला व मी लहान आहें म्हणून मला लहान लाडू वाढला. पण बापाला पूर्ण लाडू व मला अर्धा, हें त्याला पटत नव्हतें. बाप पूर्ण आहे, तर मी सुद्धां पूर्ण आहें. मी अर्धा नाहीं!...

### *दुधांतील साखर बना*

आपण महाराष्ट्रांतून इथें आलों ते इथल्या दुधाला गोड करण्यासाठीं! साखर म्हणून आलों! तेव्हां पक्षाच्या राजकारणांत पडायचें नाहीं. 'तुम्ही कोणत्या पक्षाचे' तर साखरेच्या पक्षाचे! तुम्हां सर्व लोकांचीं तोंडें शिव्या देऊन देऊन कडू झालीं असतील. तीं आम्ही गोड करणार. याप्रमाणें तुम्ही लोक राजकारणापासून अलग राहाल तर तुमची आध्यात्मिक आणि नैतिक प्रतिष्ठा

एकदम वाढेल. त्या राजकारणांत आहे तरी काय? तर म्हणे वांटणी! काय चटणी वांटायची आहे? भारतांत खायला अन्न नाहीं, ल्यायला वस्त्र नाहीं, विद्या नाहीं, आरोग्य नाहीं, औषधपाणी नाहीं. अशा स्थितींत कशासाठीं भांडायचें? हातीं काय डबोलें आलें आहे कीं त्यासाठीं भांडावें? आजकाल 'सीटा'साठीं भांडणें चालतात. असेंब्ली हीच काय जगांत जिवंत राहण्याची जागा आहे? कांहीं लोक म्हणतात कीं आम्ही असेंब्लींत गेलों तर आमचा आवाज तरी ऐकूं जाईल; इतर कांहीं चालो न चालो! मी या लोकांना प्रश्न विचारतों कीं समजा, मी उद्यां कोणत्यातरी पक्षातर्फे पार्लमेंटांत गेलों आणि तिथें एक व्याख्यान दिलें तर माझें वजन देशावर जास्त पडेल कीं सरळ जनतेंत जाऊन सेवा करण्यानें जास्त पडेल? कुणीं जर असें सिद्ध करून दाखविलें कीं पार्लमेंटमध्यें जाण्यानें जास्त वजन पडेल तर मी पार्लमेंटमध्यें जाईन. पार्लमेंटमध्यें पांच महिने कैद व्हावें लागतें व सात महिने पॅरोलवर सोडण्यांत येतें. मला तर बारा महिने जनतेंत जाऊन प्रचार करायचा आहे. पार्लमेंटमध्यें जनतेचें दर्शन होत नाहीं, जनतेच्या प्रतिनिधींचें दर्शन होतें. ज्याला साखर खायला मिळेल तो 'सा-ख-र' असा साखरेचा लिखित प्रतिनिधि कशाला होईल? त्या कागदी प्रतिनिधीला काय चाटायचें आहे? साक्षात् जनतेची सेवा करायची संधि मिळत असतांना वांकडा प्राणायाम कशाला करायचा? म्हणून कौन्सिलांत जायचें वगैरे भानगडींत इथल्या महाराष्ट्रीयांनीं मुळींच पडूं नये. मग ते महाराष्ट्रांतले महाराष्ट्रीय लोक करूं देत कांहींहि! पण इथल्या महाराष्ट्रीयांचें कार्य भांडणांत पडायचें हें नसून, भांडण मोडायचें हें आहे. जगांत जिथें जिथें 'घर्षण' होत असेल तिथें 'स्नेहन' करायचें हें आपलें कार्य आहे. म्हणून तुम्ही राजनैतिक पक्षांतून बाहेर पडावें असा मी तुम्हांला तुमचा एक हितकर्ता या नात्यानें व एक महाराष्ट्रीय या नात्यानें सल्ला देत आहें.

ही गोष्ट सरो आणि ऐकणाऱ्यांचें व सांगणाऱ्याचें पोट भरो!

: ६ :

# लोकसेवकांसाठीं पथ्यें *

आपलें जें हें काम आहे, तें राजनैतिक, सामाजिक, आर्थिक, असें सर्व प्रकारचें मिसळकार्य जरी असलें, तरी त्याचीं जीं शस्त्रें आहेत, तीं आध्यात्मिक आहेत. म्हणून आमच्या सेवकांत आध्यात्मिक योग्यता जितकी अधिक असेल तितकें हें कार्य वेगानें पसरेल. आपण म्हणतों कीं लोकांनीं आपली जमीन, संपत्ति, सोडावी; सगळ्यांना त्यांत वांटा द्यावा; सगळ्यांवर आपल्या इतकें प्रेम, समान प्रेम, राखावें. पण हें असें कां करावें? समाजावर थोडेंफार प्रेम ठेवावें, हें व्यवहारांत सगळ्यांना समजतें. त्याशिवाय जगांत चालत नाहीं. पण सगळ्यांवर समान प्रेम कां ठेवावें? आम्ही फार तर आमच्या एखाद्या नातलगाला किंवा जवळच्या शेजाऱ्याला जमीन देऊं, त्यानें आमची सेवाहि केलेली असते. पण सर्वांवर समान प्रेम करायचें, आपली संपत्ति सर्वांना वांटायची, याला कांहीं आधार आहे का? 'त्यानें समाज सुखी होईल' हें उत्तर अपुरें वाटतें. समाज कसा सुखी होईल, हा चर्चेचा विषय आहे. पण त्यासाठीं एवढें मोठें काम करावें लागल का? त्याशिवाय समाज सुखी होणार नाहीं का? म्हणून आजच्या समाजांतील स्थूल दुःखें दूर करून, आजच्या समाजाला सुखी करावें व बाकीचें पुढचें कार्य पुढच्या पिढ्यांवर सोपवावें हें योग्य नव्हे का? समाजाचा द्वेष केला नाहीं म्हणजे पुरे. शेजारी मला असें म्हणत नाहीं कीं तूं स्वतःच्या देहावर अथवा कुटुंबीयांवर जितकें प्रेम करतोस, तितकें माझ्यावर कर. तोहि माझ्यावर तितकें प्रेम करीत नाहीं. आपत्कालीं थोडी मदत केली तर त्यावर तो संतुष्ट असतो. तेव्हां तुम्ही हें कशाच्या आधारावर म्हणतां कीं सर्वांवर समान प्रेम करावें? असें लोक विचारतील. त्याला एकच उत्तर आहे, आणि तें आध्यात्मिक आहे, कीं आत्मा एक आहे. आपण सारे आंतून एक आहोंत हें सिद्ध झाल्याशिवाय सर्वांवर समान प्रेम करणें कसें जमणार? म्हणून आम्हांला तशी अनुभूति

---

* महाराष्ट्रीय भूदान-कार्यकर्त्यांसमोर दिलेलें भाषण: हुबळी, जि. धारवाड, ता. २९-१-१९५८.

झाली पाहिजे. आमच्या चित्तांत सर्वांवर प्रेम करण्याची इच्छा आहे, एवढ्यानें भागत नाहीं. त्याकरितां अनुभवच हवा. दुसरे कोणतेहि चेहरे पाहिले कीं आपण आपलाच फोटो पाहून राहिलों आहोंत अशी अनुभूति झाली पाहिजे. एकच माणूस निरनिराळ्या पद्धतीनें कधीं फेटा घालून, कधीं उघडा, कधीं ऐटींत बसून असे फोटो काढून घेत नाहीं का ? त्याचप्रमाणें आपण जगांत जे चेहरे पाहतों, ते सगळे आपलेच आहेत; पण एकच एक चेहरा पाहून कंटाळा येईल म्हणून विविधतेसाठीं हें निरनिराळ्या रंगाचे व आकाराचे, Poses मधले आपलेच फोटो आहेत; असा जर भास झाला तर मग समान प्रेम करा हें सांगावें लागणार नाहीं.

### *अन्तःशक्ति वाढण्यासाठीं प्रयत्न हवा*

पुष्कळदां आपण असें म्हणतों कीं आमचे कार्यकर्ते अपुरे पडतात. ५० कार्यकर्त्यांनीं काम होणार नाहीं, ५०० पाहिजेत. तो शस्त्रवालाहि हेंच म्हणतो कीं अधिक सेना हवी. तेव्हां आपणहि तीच भाषा बोलूं लागलों तर आपणहि संख्येला महत्त्व देतों असा अर्थ होईल. सगळ्या लोकांमध्यें अहिंसेच्या मार्गानें हा विचार पसरावयाचा आहे. कार्यकर्ते कमी आहेत म्हणून काम होत नाहीं असें म्हटलें जातें, पण कार्यकर्त्यांची अंतःशक्ति कमी पडते म्हणून काम होत नाहीं हेंच खरें उत्तर आहे. बाबा राघवदासजी गेले; दुसरे अनेक कार्यकर्ते आहेत, तरीपण त्यांची जागा कोण घेणार ? असा प्रश्न पडतो. बंदुकींनीं काम व्हायचें असतें तर एक शिपाई पडला तर दुसरा पाठविला असता. पण इथें गुणाचा मुद्दा उपस्थित झाला. त्यामुळें बाबाजींची जागा कोण घेणार असा प्रश्न निर्माण होतो. आपण सर्वोदय विचार मांडतों. स्वामित्व, ममत्व, यांच्या निरसनाची गोष्ट बोलतों व विज्ञानाच्या जोरावर आपण हें करूं शकूं असें म्हणतों. पण केवळ विज्ञानानें हें ग्रहण होणार नाहीं. लोक आमच्या मुखांतून हा विचार ग्रहण केव्हां करतील ? तो ग्रहण करण्यालायक आमचें जीवन असेल, तरच तें शक्य होईल. आज आपली संख्या शक्ति अपुरी पडते असें नाहीं; तर अंतःशक्ति कमी पडते. म्हणून कार्यकर्त्यांनीं मूलरूप तत्त्वज्ञानाचे ग्रंथ वगैरे तर वाचावेच. पण केवळ ग्रंथाचा महिमा नाहीं. तो विचार हृदयांत ठसवून घ्या, म्हणजे आपलें हृदयपरिवर्तन होईल.

आपण हृदयपरिवर्तनाची भाषा नेहमीं बोलतों व त्याचा अर्थ असा करतों कीं हृदयपरिवर्तन प्रथम शत्रूचें व्हायचें, मग मित्राचें व्हायचें, मग भावाचें, मग बायकोचें, आणि सगळ्यांत शेवटीं माझें स्वतःचें! आजकाल जो उठतो तो

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम वि:
क्रमांक नों. दि.

म्हणतो कीं भांडवलदारांचें हृदयपरिवर्तन कसें होईल; अधिकाऱ्यांचें हृदयपरिववर्तन कसें होईल! म्हणजे आपण तिऱ्हाइताच्या हृदयपरिवर्तनाची अधिक चिंता करतों. पण ही हृदयपरिवर्तनाची प्रक्रिया स्वतःपासून सुरू व्हावयास हवी. सगळ्यांचें लक्ष याकडे कीं बालेकिल्ला हातीं कसा येईल! पण प्रथम खालचा कोट हातीं घ्या मग पुढें जात जात बालेकिल्ला हातीं येईल! पण खालच्या कोटावर सुरुंग लावण्याकडे आमचें लक्ष नसतें! हृदयपरिवर्तनाची प्रक्रिया कमजोर पडते; कारण आरंभ जिथून व्हायला पाहिजे तिथून होत नाहीं. म्हणून अंतःशोधन व आत्मपरीक्षण करून अंतःशक्ति कशी वाढेल याचा प्रयत्न करावा.

### *'मी' वेगळा आणि देह वेगळा*

जर कुणीं आपला दोष सांगितला व त्याचा आपल्याला राग आला तर त्याचा अर्थ असा कीं आपल्याला कांहीं कळतच नाहीं. जर डॉक्टर म्हणाले कीं तुमच्या पोटांत रोग आहे आणि मला त्यांचा राग आला तर त्याला काय म्हणायचें? हीं मरायचींच लक्षणें आहेत! डॉक्टरनीं ती गोष्ट सांगून आपल्याशीं वैर नाहीं केलें तर आपल्यावर उपकारच केला. तसें दुसऱ्यांनीं माझा दोष सांगितला तर मला राग कां यावा? समजा, तो दोष माझ्यांत नसला तर राग यायचें कारणच नाहीं, व असला तर त्याचे उपकारच मानायला हवेत कीं त्यानें तो दाखविला. पण अशा वेळीं आपल्याला राग येतो. कारण आपल्याला आपल्या स्वरूपाविषयीं भान नसतें. समजा, कोणीं म्हटलें कीं तुझा हात कमजोर आहे आणि मला राग आला तर त्याचा अर्थ असा कीं हा हात म्हणजेच मी असें मी समजतों. कुणीं मला 'नकटें' म्हटलें तर मला राग येतो. कारण नाक हा माझ्या Personatity चा अपरिहार्य भाग आहे असें मी समजतों आणि म्हणून नाकावर आक्षेप घेतला तर माझ्यावरच घेतला असें वाटतें. ज्याला आपल्या सौंदर्याचा अभिमान असतो त्याला नकटें म्हटल्यानें राग येतो. पण नाकाहून मी वेगळा आहें याचें भान झाल्यास त्याला राग येणार नाहीं.

मध्यंतरीं मीं नवीन दांत बसविले होते. फार सुंदर होते. तोंडांत कवळी घातली कीं लोकांनीं बघतच राहावें! कांहीं दिवस मीं ती वापरली. पण पुढें टाकून दिली. कारण तिचा उपयोग चावण्याकरतां होत असे, व पुढें मला अन्न पचेना, तेव्हां मी द्रवपदार्थच घेणें सुरू केलें. दांत नसले म्हणजे उच्चार स्पष्ट होत नाहींत. तेव्हा मीं 'कचतत्त्व' वगैरे म्हणण्याचा अभ्यास केला व दांतांची

उपाधि टाकून दिली. पण जेव्हां ती होती तेव्हां रोज सकाळीं तोंडांत कवळी घातली कीं मला कांहीं तिचा अभिमान वाटत नसे. कुणी जर दांतांची प्रशंसा केली तर त्यांत दांत तयार करणाऱ्या डॉक्टरची प्रशंसा होती. माझी नव्हती. तेव्हां त्यावेळीं माझी अगदीं खात्री पटली कीं या दांतांवर माझा बरेवाईटपणा कांहीं अवलंबून नाहीं. तसा कोणीं जर माझ्या बुद्धींतला दोष दाखविला व मला राग आला तर त्याचा अर्थ असा कीं मला माझ्या स्वरूपाचें ज्ञान नाहीं. 'ती बुद्धि म्हणजेच मी' असें मी समजतों आणि म्हणून बुद्धीवर हल्ला झाला कीं माझ्यावर झाला असें मला वाटतें! पण बुद्धि म्हणजे एक कवच आहे. त्या बुद्धींत दोष नसला तर उत्तमच, पण असला आणि कोणीं दाखविला तर त्यानें माझ्यावर उपकारच केला. आपण डॉक्टरकडे जाऊन म्हणतों कीं 'डॉक्टर अलिकडे मला स्मरण राहत नाहीं' याचा अर्थ असा कीं स्मरणशक्तीहून मी वेगळा आहें. मी म्हणजे स्मरणशक्ति नव्हे. स्मरणशक्तींत बिघाड झाला हें जाणणारा मी वेगळा आहें. समजा, माझा चरखा बिघडला तर चरख्याच्या दुरुस्तीबाबत मी सुताराची मदत घेईन, त्या चरख्याहून तो सुतार जसा वेगळा तसा मीहि वेगळा. चरखा दुरुस्त करणें मला माहीत नाहीं म्हणून त्या चरख्याहून वेगळा असलेला मी, चरख्याहून वेगळा असलेल्या सुताराची त्या चरख्याच्या दुरुस्तीबाबत मदत घेतों. तसेंच स्मरणशक्तीहून वेगळा असलेला मी, स्मरणशक्तीहून वेगळा असलेल्या डॉक्टरची, स्मरणशक्ति नीट होण्याकरतां मदत घेतों. तेव्हां माझी स्मरणशक्ति कमजोर आहे व म्हणून माझ्या हातून कांहीं चुका होतात त्या चुकांकडे कुणीं माझें लक्ष वेधलें आणि मी चिडलों तर त्याचा अर्थ असा कीं ती स्मरणशक्ति म्हणजे मी असें मी मानून बसलों! जितका हा सदरा माझ्या बाहेचार आहे, तितकीच ती स्मरणशक्तिहि बाहेरची आहे. बुद्धि हें माझें आंतलें कवच आहे, पण तो माझा गाभा नव्हे. त्यावर एक इंद्रियाचें कवच असतें, त्याच्यावर देहाचें असतें. त्या सर्व कवचाच्या अगदीं आंत मी आहें. असें जेव्हां आत्मस्वरूपाचें भान मनुष्याला होईल; तें शब्दांनीं होत नाहीं, जरी शब्दांची मदत होते; पण जेव्हां भान होईल तेव्हां एकदम माणसाची भूमिका सामान्य व्यवहाराहून उंच होते.

### *दोष दाखविणाऱ्याचे उपकार मानावेत*

याकरितां सतत चिंतन-मनन करायला हवें. गुणदोष-चर्चेचा राग मानायला नको. समजा, तुमच्या घरांतून धूर निघतांना पाहून जर कुणीं सांगितलें कीं

घराला आग लागली तर तुम्ही चटकन् धावून बघतां. मग जर लक्षांत आलें कीं ती आग नसून स्वयंपाकघरांतल्या ओल्या लांकडामुळें आलेला धूर आहे, तर कांहीं हरकत नाहीं. पण समजा, खरोखरच आग असेल तर आपण बादली घेऊन धांवतों. कांहींहि असो, सांगणाऱ्याचे उपकारच मानायला हवेत. त्याच्या सांगण्यांत जर तथ्य नसलें तरी रागवायचें कांहींच कारण नाहीं व तथ्य असलें तर बादली घेऊन धांवायला हवें. तसेंच जर कुणीं आपल्यांतला दोष दाखविला तर आपल्याला राग येण्याऐवजीं आनंद व्हायला पाहिजे. समाजांतले हे लोक आपले मदतगार आहेत असें म्हणून त्यांचे आभार मानायला हवेत. तुकारामानें एका अभंगांत म्हटलें आहे कीं—" देवा, मला आतां तुझ्याशिवाय कुणी त्राता उरला नाहीं. कारण आजपर्यंत मीं संतांची मदत घेतली. पण—'**सन्तां ब्रह्मरूप झाले अवघे जन। ते माझे अवगुण न देखती।**', 'संत ब्रह्मरूप झाल्यामुळें माझे दोष पाहत नाहींत. म्हणून देवा, आतां तुझाच आधार आहे......" म्हणून जगांत दोष दाखविणारे मित्र आहेत, हा त्यांचा फार मोठा उपकार आहे, पण आम्हाला ते शत्रूच वाटतात. समजा, एखादा मनुष्य शत्रुत्वानें आपले दोष दाखवतो, पण जर तो दोष खरा असेल तर शत्रूनें दाखविला म्हणून खरा दोष खोटा होईल का ? पण तो जर खोटें सांगत असेल तर तें त्याचें पाहणें आहे. कांहींहि असो, त्याचा माझ्यावर उपकारच आहे.

ही शक्ति जर आपल्यांत आली, तर आपली शक्ति एकदम वाढेल. आज कार्यकर्त्यांत सर्वत्रच ही उणीव भासते आहे. कार्य करतांना आपण त्यांत तन्मय होऊन जातों व त्या भरांत आपलें निरीक्षण करण्याला अवकाश मिळत नाहीं. अशा वेळीं कुणी आपले दोष दाखवूं लागला तर त्याचे उपकारच माना, त्याच्यावर चिडूं नका.

### *दोषांची पाठीमागें चर्चा करूं नये*

**एक प्रश्न** : पण जेव्हां लोक पाठीमागें आपली निंदा करतात तेव्हां त्याचें वाईट वाटतें, त्याबद्दल काय करावें ?

**विनोबाजी** : लोक दोष मागें कां दाखवितात, पुढें कां नाहीं दाखवीत ? त्याचें कारण असें कीं त्यांना ही भीति वाटते कीं कोणाच्या तोंडावर दोष सांगितले तर तो चिडेल. तेव्हां लोक आमच्या मागें आमच्या दोषांची चर्चा करतात. याचें कारण हें कीं त्यांना आमच्याविषयीं इतका विश्वास पटलेला नसतो कीं ह्यांना सरळ तोंडावर सांगितलें तरी चिडणार नाहींत. पण कुणीं मागें चर्चा केली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

तरी त्याला तो अधिकार आहे. पण आपण मात्र कुणाच्या मागें त्याच्या दोषांची चर्चा करूं नये.

### *आजचें नीतिशास्त्र बदललें पाहिजे*

आज आपण सत्यापेक्षां इतर गुणांना अधिक महत्त्व दिलें आहे. समजा, एखाद्याच्या हातून व्यभिचार घडला तर ती गोष्ट सर्वांत हीन नाहीं. सर्वांत हीन आहे लपविणें. असत्य हेंच सर्वांत मोठें पाप आहे. पण आपण व्यभिचाराला फार मोठें पाप मानतों. आणि तें हातून घडलें तर लपवितों. म्हणजे हातून एक कमी दोष घडला होता, त्याच्या बदल्यांत आतां एक मोठा दोष करतों. कारण त्या दोष विषयीं समाजांत इतका तिरस्कार आहे कीं माणूस तो लपवितो. आज सत्याला मोकळेपणा एवढ्यासाठीं नाहीं कीं लोकांनीं इतर गोष्टींना सत्यापेक्षां जास्त महत्त्व दिलें आहे! त्यामुळें खरें बोलणें परवडत नाहीं. माणूस आपले सामान्य रोग लपवीत नाहीं, पण महारोगासारखे रोग लपवितो. कारण त्याविषयीं समाजांत घृणा आहे! त्यामुळें महारोगी आपला रोग लपवितो पुढें फार झाल्यावर तो प्रगट होतोच, पण तेव्हां तो दुरुस्त होण्याच्या स्थितींत नसतो. जर त्यानें आधीं सांगितलें असतें तर त्यावर इलाज होऊन तो बरा देखील होऊं शकला असता. पण त्याला लोकबहिष्काराची धास्ती असते म्हणून तो आपला रोग झांकून टाकतो. जर त्यानें रोग झांकूं नये असें आपल्याला वाटत असेल तर त्या रोगाविषयींची घृणा सोडली पाहिजे. तसेंच आज समाजांत चुकीचीं मूल्यें स्थापित झालीं आहेत कारण आजचें नीतिशास्त्रच चुकलेलें आहे. व्यभिचार, चोरी वगैरे गोष्टी वाईट आहेत, पण असत्याइतक्या वाईट नाहींत. असें मूल्य समाजांत स्थापित झालें तर ज्या माणसाच्या हातून व्यभिचार घडला, तो आपल्या आई-वडिलांना सांगेल. सर्व समाजांत सांगण्याची गरज नाहीं. पण हितकर्त्यांना सांगेल व म्हणेल कीं तुम्ही मला बचावून घ्या, मी एक रोगी आहें, असें समजून मला सांभाळून घ्या. आज समाजांत तसें सांगण्याची सोय नाहीं. कारण चुकीचीं मूल्यें स्थापित झालीं आहेत. त्यामुळें दोषाची घृणा होत आहे. आणि ते कमी होण्याऐवजीं वाढून राहिले आहेत. म्हणून नीतिशास्त्रच बदलायला हवें आहे.

आपल्यासमोर कामच काम आहे. तेव्हां माझ्या उत्साहाला तुटवडाच पडत नाहीं. थोडें काम असतें तर आळस करतां आला असता, पण खूप काम असल्यामुळें आळसाला वाव नाहीं.

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 21917 दि: [illegible]

# महाराष्ट्राचा सुगंध सर्वत्र दरवळावा

'विश्वगुणादर्शचम्पू'मध्यें भारताचे गुणदोष वर्णिलेले आहेत. त्यामध्यें महाराष्ट्रीयानें एक चरण लिहिला तर तो 'व्यास' बनतो व एक श्लोक लिहिला तर तो 'बृहस्पति' होतो, असें म्हटलें आहे...भारतांतील निरनिराळ्या प्रांतांना निरनिराळीं शेपटें आतां लावीत आहेत. उदाहरणार्थ : विशाल आंध्र, महागुजरात वगैरे वगैरे. महाराष्ट्रानें विचारपूर्वक 'महा' हा शब्द सोडून दिला आहे. 'महाराष्ट्र' हा मूळचाच एक शब्द आहे. ह्यामध्यें 'महा' हें मूळचेंच पद आहे. संस्कृतामध्यें निरनिराळ्या प्रान्तांचें विवेचन करतांना अनेकवचन वापरण्यांत येतें. जसें, 'गुर्जरेषु, वंगेषु, कलिंगेषु,' परन्तु महाराष्ट्राचा उल्लेख एकवचनीच असतो. त्यासंबंधीं बहुवचन वापरण्यांत येत नाहीं. जसें, 'महाराष्ट्रे, महाराष्ट्रस्य' ह्यावरून महाराष्ट्रामध्यें जगत्कल्याणाबद्दल एकमत असे ही एक गोष्ट; दुसरी गोष्ट, महाराष्ट्रामध्यें एकराष्ट्रीय नव्हे, तर राष्ट्रसमूहाची वृत्ति असावी अशी अपेक्षा आहे...

महाराष्ट्राला बहुवचन वापरण्यांत येत नाहीं असें मीं आतां म्हटलेंच आहे. परन्तु सध्यां महाराष्ट्रामध्यें संकुचित प्रांताभिमान आहे. 'महा' राष्ट्र असा आपला खरा बाणा आहे. त्याला आपण जागूं या...

रविंद्रनाथ टागोर विश्वकवि झाले. त्यांच्या काव्यामध्यें संकुचिततेचा लवलेशहि नाहीं. विश्वभारती ही संस्था त्यांनीं स्थापिली. यामध्येंहि त्यांची विशाल दृष्टीच दिसून येते. अलिकडील कवींची दृष्टि संकुचित आहे. पेशवाईत कांहीं चांगल्या गोष्टी झाल्या आणि त्या गोष्टींबाबत मला नितांत आदर आहे. परंतु पेशवाईनंतर ही संकुचित दृष्टि आली. ज्ञानदेव आपले गुरु आहेत. त्यांच्या व्यापक दृष्टीचा वारसा आपण घेतला पाहिजे. आपण महाराष्ट्रीयांनीं असें वागलें पाहिजे कीं, महाराष्ट्राचा सुगंध सर्वत्र दरवळावा!

—*विनोबा*

[एका भाषणांतील महत्त्वाचा अंश]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम क्रमांक ...... विः
...... नोंः दिः
मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्र. क्र. ९८००

# एकला चलो रे

चाळीस वर्षांपूर्वी एक शास्त्रवचन वाचलें होतें— "**एकाकी पौरुषं कुर्यात्।**" "माणसानें जगांत जें कांहीं पुरुषार्थ–साधन करायचें आहे तें एकट्यानेंच केलें पाहिजे." त्यानंतर भगवान् बुद्धांचें एक वाक्य वाचलें: "**अको चरे खग्ग विसाण-कप्पो।**" जसें गेंड्याला एकच शिंग असतें, त्याप्रमाणें यतीनें एकटेंच फिरलें पाहिजे. भगवान् बुद्धांना बोधगयेंत बोध–लब्धि झाली. त्या वेळीं त्यांचें वय तीस वर्षांचें होतें. इहलोक सोडला तेव्हां ऐंशीं वर्षांचें त्यांचें वय होतें. ते पन्नास वर्षें फिरले. ते इतके फिरले कीं भारताच्या एका सबंध प्रदेशाला 'विहार' नांव मिळालें. विहार म्हणजे 'विचरण–स्थान.' जगांत अशीं उदाहरणें मिळत नाहींत कीं कुणा महापुरुषाच्या यात्रेचें स्मरण म्हणून एका प्रदेशालाच कांहीं नांव मिळालें आहे! त्यांचा आदेश एकटें फिरण्याचा होता. ही प्रेरणा आम्हांला बालपणापासूनच मिळाली आहे. तिची संधि भूदान–यज्ञानें दिली.

शास्त्रानें आणि भगवान् बुद्धांनीं जो आदेश दिला त्याचा अर्थ आम्हीं आपल्या पद्धतीप्रमाणें लावला, शब्दांचे कांहीं अर्थ समावेशक असतात व कांहीं व्यावर्तक असतात. या आदेशाचा व्यावर्तक अर्थ होतो—'इतरांपासून अलग होऊन एकट्यानें फिरलें पाहिजे.' असाच अर्थ पुष्कळांनीं केला आहे. आम्ही असा अर्थ समजलों नाहीं. आम्ही 'समावेशक' अर्थ समजलों. जगांत केवळ आम्हीच आम्ही आहोंत अशा व्यापक रुपानें आम्हीं अर्थ घेतला. गीतेच्या बाराव्या अध्यायांत भक्ताचें लक्षण आहे. "**अनिकेतः स्थिरमतिः**"—ज्याला घर नाहीं, तो स्थिरबुद्धि. शरीर फिरत राहतें, पण बुद्धि एका ठिकाणावर स्थिर आहे. 'त्याला घर नाहीं' असें वाक्य गीतेंत आलें. आणि ज्ञानदेवानें ज्ञानेश्वरी'मध्यें त्याचा अर्थ सांगितला आहे—"**विचरे विश्व होऊनी विश्वामाजीं**". विश्वरूप होऊन विश्वांत फिरतो. 'घर नाहीं' याचा अर्थ विश्वच आपलें घर आहे. शास्त्रवचनांचे अर्थ 'समावेशक' घ्यावयाचे असतात ही खुबी 'ज्ञानेश्वरी'मध्यें दिसून येते.

सर्व समाज आपलेंच रूप आहे याच भावनेनें या (भूदान) यात्रेंत आम्ही फिरलों!...

—*विनोबा*

[एका भाषणांतून]

ग्रंथ संग्रहालय
९८०७

REFBK-0009800

* * * *

महाराष्ट्राची विशेषता त्याच्या भक्ति-साहित्यांत दिसून येते. महाराष्ट्रीय भक्तांचें एक वैशिष्ट्य आहे कीं ते ईश्वराला '**माउली**' म्हणतात. ज्ञानेश्वरांनीं तर "**जेथ प्रियाची परसीमा। तेथ भेटे माउली आत्मा**" असें म्हटलें आहे. ईश्वराच्या बाबतींत माउलीचा उल्लेख इतर भाषांतूनहि क्वचित् सांपडतो. परन्तु मी दहा बारा भाषांचें अध्ययन केलें असूनहि कोणत्याहि भाषेंत आत्म्याला माउली म्हटल्याचें माझ्या वाचनांत नाहीं.

—विनोबा

* * * *

**मूल्य ३७ नवे पैसे**

**[सहा आणे]**